
प्रा. कुमार देशमुख




BVBK-0402521

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रंथ संग्रहालय विभाग
क्र. २५२२७. दिनांक २८।५।९७
विषय वाचा रु. . . . .



सोनेरी डोक्याचा मासा



# सोनेरी डोक्याचा मासा

प्रा. कुमार देशमुख

BVBK-0402521

**कीर्ती प्रकाशन**

औरंगाबाद

Soneri Dokyacha Masa By Prof. Kumar Deshmukh

(Drama for Childrens)

Price Rs. 15/-

---

© प्रा. कुमार देशमुख,

माहेर, सन्मित्र कॉलनी, औरंगाबाद. ४३१ ००१

प्रकाशन दिनांक : १५ ऑगस्ट १९९०

प्रकाशक : सूर्यकान्त दाणेकर
कीर्ति प्रकाशन,
"राजश्री" १७ रचनाकार कॉलनी,
देवगिरी कॉलेज जवळ,
औरंगाबाद. ४३१ ००५

अक्षर जुळणी : विश्वास गवळी
परफेक्ट टाईपसेटर्स अॅण्ड प्रिन्टर्स
हॉटेल ओबेरॉय समोर, उस्मानपूरा,
औरंगाबाद.

मुद्रक व मुद्रणस्थळ : महावीर पेपर प्रॉडक्टस् प्रा.लि.
एम.आय.डी.सी.,रेल्वे स्टेशन
जवळ,
औरंगाबाद.

मूल्य : पंधरा रुपये

---

प्रयोग करण्यापूर्वी लेखकाची परवानगी आवश्यक.

सादर समर्पण.

''नाट्यरंग'' औरंगाबाद.

- प्रा. कुमार देशमुख

या नाटकाचा प्रथम प्रयोग नाट्यरंग औरंगाबाद तर्फे ४ जून १९७८ रोजी स.भु.नाट्यगृह औरंगाबाद, येथे झाला. त्यामधील सहभागी कलावंत :-

विदूषक: डॉ.आलोक चौधरी
राजपूत्र: प्रकाश वैद्य
यक्ष: संजय रसाळ
राजा: कुमार देशमुख
राणी: सौ.चित्ररेखा देशमुख
थंडगार: डॉ. अशोक कुलकर्णी
लांबहात्या:श्रीकांत कुलकर्णी
झांबो राजा: प्रकाश देवा
प्रधान: राजेन्द्र कुलकर्णी
चेटकीण: सतीश इंदापूरकर
मोर: कु.राजश्री वैद्य
उंदीर: संजय वैद्य
हत्ती: शेख हमीद व साथीदार
दवंडीवाला: सुहास इंदापूरकर
खर्वस ऋषी: प्रा.अजित दळवी
वेताळ: रवि कुलकर्णी
सैनिक: पुरूषोत्तम देशपांडे, शिरीष गायधनी, अवि गायधनी, संजय मगीरवार, सुरेश बुलगे, नरेन्द्र आष्टीकर व अजय देशमुख

नेपथ्य: प्रकाश देवा.
रंगभूषा: नंदकुमार पत्की व रवि कुलकर्णी
वेषभूषा: शेख हमीद
प्रकाशयोजना : प्रकाश तापी
गीत : प्रकाश वैद्य.
गायन: सौ.चित्ररेखा देशमुख
संगीत: प्रा.सौ.चित्ररेखा देशमुख

दिग्दर्शक: डॉ.आलोक चौधरी

## मनोगत

*आजपर्यंत नाटके लिहिली, बसवली व सादर केली पण पुस्तक छापण्याचा मोह टाळला. या वेळेस मात्र या मोहात सापडलो. त्यासाठी कारणीभूत असणाऱ्या सर्वांचे व हे पुस्तक प्रत्यक्षात येण्यासाठी ज्यांचा ज्यांचा, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे हातभार लागला, त्या सर्वांचे आभार!*

कुमार देशमुख

ह्या नाटकाचे नेपथ्य अगदी साधे म्हणजे सहा काळ्या विंगस् पाठीमागे पांढरा पडदा (वेगवेगळे रंग दाखविण्यासाठी) आणि रंगमंचाच्या वरच्या बाजूस डाव्या विंगेतून उजव्या विंगेत जाणारा असा लांब डायस. या डायसच्या व पांढऱ्या पडद्याच्या मध्ये असलेल्या जागेमध्ये होडी, प्राणी इ. दाखवता येते.

**होडी:** एक ट्रॉली. जिला दोऱ्या बांधून इकडून तिकडे ओढता येते, आणि नावेचा कट आउट

**प्राणी:** वरच्याच ट्रॉलीवर भयानक प्राण्याचा फक्त चेहरा. जो कागदाच्या लगद्यापासून तयार केला होता.

**तरंगणे:** त्याच ट्रॉलीवरून यक्ष, राजपुत्र विदूषक यांचे पाण्यावरून तरंगत जाणे दाखवता येते.

**चेटकीण:** मोठा झगा व आतमध्ये एकाच्या खांद्यावर दुसरे पात्र बसलेले. जेव्हा चेटकीण बुटकी होते तेव्हा, वरचेच पात्र गुडघ्यावर चालत येते.

**लांबहात्या:** एका हाताला पत्र्याची नळी लावलेली व त्यातून एरीयलप्रमाणे निघत जाणाऱ्या इतर नळ्या, त्यासाठी जेंव्हा हात लांब होतो तेंव्हा विदूषकाने हात ओढणे आवश्यक.

**दिव्यरत्न व गोलक:** सेल्स, बटन आणि बल्ब यांच्या सहाय्याने.

वरील सर्व युक्त्यांमध्ये कल्पना आणि कृति याबाबत सिंहाचा वाटा असणाऱ्या श्री. प्रकाश देवा याचे मनःपूर्वक आभार.

तसेच याच नाटकावर बाल-चित्रपट तयार करतांना ज्यांनी मनापासून मदत केली त्या-

**श्री. बाळासाहेब खेकाळे, श्री. प्रभाकर भावे, श्री. कुमार खेकाळे, यांचे मनःपूर्वक आभार !**

कुमार देशमुख

# - अंक पहिला -

2129
१८।५।०९

दवंडीवाला : ऐका हो ऐका - आज सायंकाळी होणाऱ्या दरबारामध्ये आपले युवराज यांना राज्याभिषेक होणार आहे. तरी सर्वांनी राजवाड्यासमोरच्या भव्य पटांगणावर जमावे. याप्रसंगी सुवर्ण मोहरा वाटल्या जाणार आहेत. तसेच अन्नछत्र सुध्दा उघडण्यात येणार आहे. तरी सर्वांनी अवश्य यावे हो ऽऽ -

*(राजवाडा)*

**राजा, राणी व युवराज येतात,** *(फ्रीझ)*

**विदूषक** - *(कोलांटया उडया मारत प्रेक्षकांसमोर)* राम राम मंडळी. ओळखलं का मला? अहो मी इथला विदूषक, आज इतका आनंदाचा दिवस आहे म्हणून मी कपडे सुध्दा किती चांगले घातले आहेत बघा. फक्त माझ्या पायात जोडे नाहीत. कारण काय झालं माहिती आहे. मी दारात उभा होतो. तेवढयात पाठीमागून एका म्हशीनं धडक मारली म्हणून तर मी असा उलटा सुलटा आलो इथं आणि जोडे गेलेत आकाशात उडून. आता ते कधी मिळतात कुणास ठाऊक? *(आकाशातून जोडे पडतात)* वा ! अगदी वेळेवर मिळाले हं ! तर मंडळी, हा आमचा राजवाडा, हे महाराज, ह्या महाराणी आणि हे युवराज, यांनाच राज्याभिषेक होणार आहे. थांबा हं! आता मी यांची मजा करतो. *(रडतरडत राजा जवळ जातो. सर्व पात्रे हलू लागतात.)*

**राजा** - अरे अरे, काय झाले? अशा शुभ प्रसंगी रडण्याचे काय कारण. *(तिघेही शांत करु लागतात. थोडा वेळ असाच जातो.)*

**विदूषक** - महाराज मला फार वाईट वाटतंय?

**राणी** - वाईट वाटायला काय झालं? युवराज तुझा लहानपणाचा सोबती, आणि त्याला आज राज्याभिषेक होणार आहे. तुला त्यात आनंदच वाटायला पाहिजे.

**विदूषक** - म्हणूनच वाईट वाटतंय.

**राजा** - *(रागावतो)* काय? म्हणायचंय काय तुला?

**विदूषक** - रागावू नका महाराज, मला असं म्हणायचंय की, आज युवराज राजे होणार मग मला पुन्हा त्यांच्याबरोबर पहिल्यासारखं कसं खेळता येईल, म्हणून मला वाईट वाटलं.

युवराज - महाराज, ही त्या विदूषकाची नेहमीचीच गंमत सुरु आहे.
राजा - अस्सं होय, मग हरकत नाही. पण युवराज सांगितलेलं सगळं लक्षात आहे ना. आता तुम्हाला सगळया विद्या अवगत झाल्या आहेत. काहीही शिकायचं राहिलेलं नाही.
विदूषक - सगळ्या विद्या मिळाल्या ? असं शक्यच नाही.
राजा - कोण म्हणतं शक्य नाही म्हणून ?
विदूषक - अस्सं ! सांगा बरं काय काय शिकून झालंय ते ?
राजा - काय म्हणजे ? अश्वारोहण कलेमध्ये तो निपुण आहे.
विदूषक - म्हणजे घोडयावर बसण्यातच ना ? पण त्यांना सायकल चालवता येते कां ? *(सगळे गप्प)*
राणी - तो तलवारीचे हात चांगले करतो.
विदूषक - पण विटी-दांडू खेळता येतो कां ?
राजा - तो धनुष्यबाण अचूक चालवतो.
विदूषक - पण गोटया खेळता येतात कां ?
राणी - आकाशात उडणाऱ्या पक्षाला तो भाल्याने मारतो.
विदूषक - पण आकाशात पतंग उडवता येतो का ?
राजा - तो जंगलात जाऊन वाटेल त्या प्राण्याची शिकार करु शकतो.
विदूषक - पण त्याला आटया-पाटया खेळता येतात कां ?
राणी - मोठमोठया विचारवंताना तो वादविवादामध्ये हाताच्या बोटावर फिरवील.
विदूषक - पण वरच्यावर हातावर घेऊन त्याला भोवरा फिरवता येईल काय ?
राजा - *(चिडतो)* हे सगळं काय चाललं आहे ? युवराज ह्या कोणत्या विद्या आहेत ? तुम्हाला का येत नाही.
युवराज - महाराज, हे लहान मुलांचे खेळ आहेत. हा बोलून चालून पडला विदूषक. तो आपल्याला हसवण्याचा प्रयत्न करतो आहे.
राजा - अस्सं होय ! पण विदूषका, तुझ्या अशा विनोदांनी आम्हाला हसू येणार नाही. जा दुसरा काहीतरी प्रकार शोधून काढ. चला युवराज, तुम्हाला काही महत्वाच्या गोष्टी सांगावयाच्या आहेत. *(राजा, राणी व युवराज जातात.)*
विदूषक - पाहिलंत मंडळी, कसे असतात हे राजे लोक ? साध्या गोटया सुध्दा खेळता येत नाहीत त्यांना. जाऊ द्या आपल्याला काय करायचंय

म्हणा ? आपलं काम काय तर यांना हसवायचं, आता कसं काय हसवावं बाबा यांना ?

थांबा जरा. विचार करतो. *(कोलांटी उडी मारतो.)* हां ! आता मेंदू काम करु लागलाय. अरे ! अरे ! पण हे कोण येतंय इकडे? अरे बापरे ! हे तर दुर्वास ऋषीचेच अवतार खर्वस ऋषी. मी तर पळतो बाबा. नाहीतर मी कांहीतरी विनोद करायला जाणार आणि हे डोक्यात राख घालून घेणार आणि मला शाप देऊन बसणार. बरं कां मंडळी, तुम्ही सुध्दा हसू नका बरं का. हे ऋषी महा रागीट आहेत. नुसतं तुम्हाला हसताना पाहिलं तरी शाप देतील. सांभाळा हं. *(विदूषक जातो, ऋषी येतात.)*

**ऋषी** - कमाल आहे ! माझ्या स्वागताला सुध्दा कोणी येत नाही. पहिल्यांदाच मी राजाला व युवराजाला आशिर्वाद द्यायला आलो आणि त्यांचा पत्ताच नाही. वा ! राजा ... *(हाका मारतो.)(राजा, राणी व युवराज येतात.)*

**राजा** - *(आपसात)* हा विदूषकच दिसतोय बरं कां ! वा ! काय पण पटकन सोंग घेऊन आलाय. *(तिघेही हसू लागतात)*

**ऋषी** - राजा ! हसायला काय झालं. मी खर्वस ऋषी.

**राजा** - खर्वस ऋषी कां ? वा ! चांगलं नांव आहे. *(हसतो)*

**ऋषी** - मी आश्रमातून मुद्दामहून आलो आहे.

**राजा** - आश्रमातून आलात काय ? छान छान *(हसतो.)*

**ऋषी** - आजच्या शुभ प्रसंगी मी मुद्दामहून आशीर्वाद द्यावयास आलो आहे.

*(राणी व युवराज साशंक. राजा मात्र वाक्याला जोरजोरात हसतो आहे.)*

**राजा** - बरं झालं आलात, नाहीतर आजचा समारंभच अडला असता.

**ऋषी** - राजा, तू माझी चेष्टा तर करीत नाहीस ना.

**राजा** - छे ! छे ! तुमच्यासारख्या श्रेष्ठ मुनीवरांची चेष्टा करायला मी काय वेडा आहे. *(पुन्हा हसतो.)*

**ऋषी** - राजा, आजपर्यंत माझ्यासमोर हसण्याची कुणाची हिम्मत झाली नाही. केवळ तू राजा आहेस म्हणून मी गय केली ? पण तू तर माझीच चेष्टा करतो आहेस. लक्षात ठेव, याचे परिणाम अत्यंत वाईट होतील. नंतर तुला पश्चाताप होईल.

**राणी व युवराज** - महाराज, त्यांचं ऐका, ते खरंच ऋषी दिसताहेत. तुमचा

गैरसमज होतोय.

**राजा** - *(हसतो)* तुम्ही दोघे फसलात तरी मी फसणार नाही. हा सोंगाडया मला फसवू शकणार नाही. थांबा आताच त्याचे ख़रे स्वरुप प्रगट करतो. *(जाऊन दाढी ओढतो. निघत नाही.)*

**ऋषी** - राजा ! - *(चिडलेला. तिघेही गप्प.)* आता मात्र हद्द झाली. तुझ्या थिल्लरपणाची. माझ्यासारख्या महान ऋषीचा अपमान करतोस. मी तुझ्यासमोर उभा असूनसुध्दा तुला ओळखता आलं नाही ? म्हणजे डोळे असून सुध्दा तू पाहू शकत नाहीस. तुला डोळयाचा उपयोगच करता येत नाही असे मला वाटते. म्हणून मी तुला शाप देतो की, ज्या डोळयांचा तू उपयोग करु शकला नाहीस ते डोळे तुला सोडून जातील. तू आंधळा होशील. *(तिघेही नको नको म्हणत असतानाच गडगडाट होऊन राजा आंधळा होतो.)*

**राणी** - हे काय केलंत मुनीवर, इतके कोपित होवू नका, त्यांना माफ करा.

**ऋषी** - नाही. त्याला योग्यच शिक्षा मिळालेली आहे.

**युवराज** - मुनीवर आजचा दिवस इतका आनंदाचा पण या गोष्टीमुळे सगळया नगरीच्या उत्साहावर पाणी फिरेल. सर्वत्र दुःखाची छाया पसरेल.

**राजा** - *(धडपडत येऊन वंदन करतो.)* मला माफ करा मुनिवर. माझ्याकडून नकळत अपराध घडला. पण त्याची एवढी कठोर सजा देऊ नका *(तिघेही गयावया करतात. थोडा वेळ जातो. नंतर...)*

**ऋषी** - ठीक आहे, तुम्ही एवढी गयावया करता आहात तर मी एक उःशाप देतो. जर ४० दिवसांच्या आत एक उपाय केला तरच राजाचे डोळे परत येतील.

**युवराज** - कोणता उपाय आहे ? सांगा. आम्ही काय वाटेल ते करुत.

**ऋषी** - तांबडया समुद्रामध्ये एक सोनेरी डोक्याचा मासा आहे. त्या माश्याला जिवंत पकडून आणा. त्या माश्याला जर ४० दिवसांच्या आत आणू शकलात तरच राजाचे डोळे परत येऊ शकतील. त्यानंतर मात्र त्या माशाचा काहीच उपयोग होणार नाही. *(जातो.)*

**युवराज** - महाराज आपण काळजी करु नका. काय वाट्टेल ते झालं तरी मी तो मासा पकडून आणीन. जा आपण. आराम करा. *(महाराज व राणी जातात. विदूषक येतो.)* विदूषका कुठे होतास तू ?

**विदूषक** - युवराज मी लपून बसलो होतो. मी त्या ऋषींना फार घाबरतो.

पण इथं काय झालंय ते पाहिलंय मी. युवराज चला! आपण तो मासा शोधून काढूयात. सर्व सैन्याला ते काम सांगा. मला एक जागा माहिती आहे. त्या ठिकाणी मी एकदा तो मासा पाहिला होता. आपण दोघं त्याच ठिकाणी थांबू बाकी सैन्याला सर्वत्र शोधू द्या. *(जातात.)*

(प्रवेश पहिला समाप्त)

## (प्रवेश दुसरा)

*एक होडी जातांना दिसते. त्यामध्यें वल्हवणारा व जाळे टाकणारा. होडी थांबते, युवराज व विदूषक आणि एक सैनिक येतात.)*

**युवराज** - विदूषका इतकं सगळीकडे शोधून झालं पण तो मासा कांही आपल्याला सापडला नाही. आज शेवटचा दिवस आहे. बरोबर ४० दिवसांच्या आत मासा मिळाला नाही तर उपयोग होणार नाही, असं त्या ऋषींनी सांगितलं आहे. आणि अजूनही आपल्याला तो मासा सापडलेला नाही.

**विदूषक** - युवराज आपले दुर्देव आहे. दुसरं काय? आपण अशी प्रार्थना करु की आपल्या एखाद्या सैनिकाला तरी तो मासा सापडेल. युवराज तुम्ही आता जरा आराम करा. आम्ही दोघं पाहतो कांहीं सापडतंय का? *(युवराज तिथे झोपतो. सैनिक जाळे टाकतो आहे. विदूषक हात पाण्यांत घालतो)*

**विदूषक** - अरे मला काय सापडलं बघा. अरे बापरे! हा तर खेकडा आहे. *(घाबरुन सैनिकाच्या अंगावर खेकडा उडवतो.)* सैनिकाची धावपळ. सैनिक विंगेत जातो. विदूषक घाबरुन समुद्रात लपतो. सैनिक येतो.) युवराज जागा झालेला.)

**युवराज** - काय झालं रे एवढा आरडाओरड करायला?

**सैनिक** - महाराज, त्या विदूषकानं माझ्या अंगावर खेकडा फेकला होता. कुठे गेलाय तो ते मी पहातो. त्याला अद्दल घडवल्याशिवाय मी राहणार नाही.

**युवराज** - जाऊ दे त्याला. तुला काही कळतंय का नाही? आपण इथं कशाकरता थांबलोत ते. मी थोडा वेळ आराम करत होतो तर तुम्ही खेळत बसलांत वाटतं. जा पुन्हा जाळ टाक *(सैनिक जाळं टाकतो.*

*जड लागते.)*

**सैनिक -** महाराज जाळयामध्यें काहीतरी सापडलंय. मला वाटतंय देवमासा असावा. मला मदत करा महाराज *( दोघे जाळे ओढतात. युवराज तलवारीने मारु लागतो.)*

**विदूषक -** *(जाळयात सापडलेला)* थांबा थांबा. मारु नका. मी आहे इथे *(दोघे त्याला सोडवतात)* माफ करा युवराज, मी घाबरुन लपलो होतो. *(दोघे त्याला मारु लागतात. तो पुन्हा उडी मारु लागतो.)* युवराज, तो पहा मासा, त्याचे डोके बघा कसे चकाकते आहे. *(तिघेही पाहू लागतात. सैनिक जाळे टाकू लागतो, विदूषक काठीने माशाला अडवू लागतो. युवराज दोघांनाही थांबवतो.)*

**युवराज -** थांबा तो मासा समजूतदार दिसतो बघा, माझ्याकडे पहातोंय तो. हे मास्या मी तुला विनंती करतो की तू माझ्या बरोबर चल, मी तुझे रक्षण करीन. सैनिका ते भांडे आण इकडे, *(सैनिक भांडे आणतो, पाण्याने भरतो, राजपुत्र हाताने उचलून माश्याला भांड्यात सोडतो.)* पाहिलंत किती शहाण्या सारखं हा मासा वागतोय ते. मासा तर सापडला पण आजचा दिवस मात्र संपत आहे. चला. आपण लवकर राजवाडयाकडे जाऊत.

*(अंधार)*

## प्रवेश ३रा

*(राजवाडा दिसतो, महाराज व राणी वाट पहातांना)*

**राजा -** किती वेळ झाला ? अजून दुसरा दिवस उजाडायला किती वेळ आहे ?

**राणी -** महाराज, सांगायला दु:ख होते आहे की थोडयाच वेळात ४० दिवसांची मुदत संपणार आहे. थोडयाच वेळात सूर्योदय होईल आणि ४१ वा दिवस उजाडेल.

**राजा -** अरेरे ! किती मी दुर्दैवी. आता मला कधीच काहीही दिसणार नाही, असेच वाटते. आता जर का सूर्योदयापर्यंत तो मासा घेऊन कुणी आलं नाही तर मी आता कायमचाच आंधळा होणार असे वाटतेय.

**राणी -** महाराज कुणीतरी येतंय *(ऋषी येतो.)*

**ऋषी -** राजा मी आहे खर्वस ऋषी. मी तुला आठवण करुन द्यावयाला

आलो आहे की, तुला दिलेली मुदत संपत आलेली आहे. अजून काही क्षणांचा अवधी आहे. अजूनही तो मासा मिळाला आणि तू तुझ्या हाताने त्याचे दोन तुकडे केलेस तर तुला दृष्टी प्राप्त होऊ शकेल.

**राजा** - पण मुनिराज अजून तरी तो मासा सापडलेला नाही.

**ऋषी** - राजा, ते तुझे दुर्दैव आहे. *(थोडा वेळ जातो)* राजा मुदत संपली. तो पहा सूर्योदय होत आहे. *(सूर्योदय होतांना दिसतो.)* राजा आता काहीही फायदा नाही. तुझ्या एवढया मोठया राज्यातला कुणीही तो मासा पकडू शकला नाही. आता यापुढे तू आणि तुझे नशीब.

**राजा** - थांबा मुनीवर. दुसरा काहीतरी उपाय सांगा.

**ऋषी** - नाही, आता माझ्या हातात काहीच राहिलेले नाही. आता जशी ईश्वराची इच्छा असेल तसेच होईल. *(इतक्यात युवराज व विदूषक माशाला घेऊन येतात.)*

**युवराज** - महाराज. हे पहा मला मासा सापडला.

**राजा** - *(आनंदीत होतो)* आण ! आण इकडे तो मासा, मी माझ्या हाताने त्याचे दोन तुकडे करतो. म्हणजे मला दिसू लागेल. *(सुरा काढून माशावर चालवू लागतो.)*

**ऋषी** - थांब ! राजा, आता त्याचा काहीही उपयोग नाही, विनाकारण त्या माशाची हत्या करु नकोस.

**महाराज** - म्हणजे, मुनीवर आपल्या बोलण्याचा अर्थ काय ?

**ऋषी** - युवराज, तुला मासा सापडला, पण आता त्याचा उपयोग नाही, कारण ४१ व्या दिवसाला सुरुवात झालेली आहे.

**राजा** - पण दिवस आताच तर सुरु झाला आहे. कदाचित अजूनही फायदा होऊ शकेल.

**ऋषी** - नाही राजा ! माझ्या शब्दावर विश्वास ठेव. माझ्या शब्दाविरुध्द काहीही घडणे शक्यच नाही.

**युवराज** - *(भांडे आपल्या ताब्यात घेतो.)* महाराज, मुनीवरांचं ऐका ?

**राजा** - तो मासा इकडे आण आधी.

**युवराज** - नाही, महाराज विनाकारण त्याची हत्या करु नका.

**राजा** - काय ? माझी अवज्ञा ? लक्षात ठेव. मी अजून राजा आहे इथला. प्रत्येकाने माझी आज्ञा ऐकलीच पाहिजे.

**युवराज** - नाही महाराज. आपण चुकीची गोष्ट करता आहात. मी त्या मुक्या प्राण्याचा जीव घेऊ देणार नाही.

राजा - युवराज. तुला माझ्या डोळयांपेक्षा त्या मुक्या प्राण्याचा जीव जास्त महत्वाचा वाटतो ? *(राणी दोघांना समजावत आहे.)*

युवराज - महाराज, तुमचा गैरसमज होतो आहे. तुमच्या डोळयांसाठी मी माझे प्राण पण द्यायला तयार आहे. पण जर तुमचे डोळे परत येणार नसतील तर या मुक्या प्राण्याची हत्या कदापीही होऊ देणार नाही. हा मासा म्हणजे दैवी चमत्कार आहे. तुम्हाला कल्पना नाही महाराज, पण याला माझं बोलणं समजतं.

राजा - मूर्खासारखी बडबड करु नकोस. तुला शेवटचे सांगतो. तो मासा इकडे दे.

युवराज - नाही महाराज तुम्हाला मी हे पाप करु देणार नाही.

राजा - तुला कल्पना आहे, याच्रे काय वाईट परिणाम होतील त्याची ?

युवराज - महाराज या माश्याचे प्राण वाचविण्यासाठी मी काय वाट्टेल ते परिणाम सहन करायला, द्याल ती शिक्षा भोगायला तयार आहे. *(राजा अस्वस्थ, विदूषक शाब्बासकी देतो.)*

ऋषी - शाब्बास युवराज. तू खरा मानव शोभतोस. जातो मी.

राणी - थांबा मुनिवर. या संकटातून तुम्हीच वाचवू शकाल.

ऋषी - नाही राणी, मी थांबलो तर कदाचित पुन्हा माझा राग अनावर होईल आणि तुझ्या पतीदेवाचं पुन्हा आणखीच वाईट होईल.

राजा - *(रागाने)* गोसावडया. मी आता तुला भीत नाही. तू मला आंधळं केलं आहेस. याचा बदला मी जरुर घेईन. कोण आहे रे तिकडे ? पकडा या गोसावडयाला. आणि शिरच्छेद करा त्याचा *(दोन सैनिक ऋषीला मारु पाहतात. तो मंत्र टाकतो. दोघेही पुतळयाप्रमाणे उभे राहतात.)*

ऋषी - राजा. तू हद्दीच्या बाहेर उद्दामपणा करतो आहेस. तुझ्या सैनिकांवर मी मंत्र टाकला आहे. ते मला काहीही करु शकत नाहीत.

राजा - थांब. मी माझ्या सुऱ्यानं तुझा जीव घेईन. मी शब्दवेधी आहे. *(ऋषी मंत्र पुटपुटतो. राजाचे दोन्ही हात चिकटतात.)*

ऋषी - राजा. मी मंत्राने तुझे दोन्ही हात बध्द केले आहेत. मी जाईपर्यंत तुझ्यावर व सैनिकांवर मंत्र चालेल. नंतर तुम्ही मुक्त व्हाल. पुन्हा माझ्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करु नकोस. खरे म्हणजे मी तुला भस्मच करायला पाहिजे, पण युवराज आणि राणीकडे पाहून मी तसं करत नाही. राणी. काळजी करु नकोस. तुझा मुलगा सुरक्षित राहील. युवराज माझे आशिर्वाद तुझ्या पाठीशी आहेत. आणि राजा माझे शब्द लक्षांत ठेव. ज्या युवराजाचा

तू तिरस्कार करतो आहेस, त्याचीच तू माफी मागशील. जातो मी. *(जातो. राजा व सैनिक पूर्ववत)*

**राजा** - माझ्या राज्यात माझाच अपमान ?

**राणी** - महाराज आपण एवढे क्रोधीत होऊ नका.

**राजा** - मी माझ्या पुत्राची माफी मागणार काय ? ठीक आहे. मी त्या ज्योतिष्याचे शब्दच खोटे ठरवतो सैनिकांनो आताच्या आता युवराजाचा शिरच्छेद करा.

**राणी** - महाराज, काय भयानक बोलता आहात. अहो तो आपला एकुलता एक पुत्र आहे. तो उद्याचा राजा आहे... त्याला अशी कठोर सजा देऊ नका.... मी पाया पडते तुमच्या... ठीक आहे. लक्षांत ठेवा की, युवराजाचा प्राण घेतलात तर मी पण जीव देईन.

**राजा** - ठीक आहे. तुझ्याकरता म्हणून मी युवराजाला सोडतो. पण तो या राज्यात रहायला नको. ताबडतोब त्याला या राज्यातून हाकलून द्या व राज्यात दवंडी पिटवा की कोणीही त्याच्या बरोबर संबंध ठेवायचा नाही.

**राणी** - महाराज, ही किती कठोर शिक्षा दिली तुम्ही ?

**राजा** - नाही. मी सांगतो ते बरोबर आहे. युवराज, ताबडतोब या राज्यातून बाहेर निघून जा. पुन्हा तोंड दाखवू नको.

**युवराज** - ठीक आहे महाराज, जातो मी, पण लक्षात ठेवा की मी नेहमी तुमच्या सुखाचा विचार करीत राहीन.

**राजा** - जा ! चालता हो इथून.

**युवराज** - महाराज, हा मासा मी बरोबर नेतो. त्याला पुन्हा सोडून देतो.

**राजा** - जा. घेऊन जा. पुन्हा जर या राज्यात दिसलास तर मात्र तुला अगदी कठोर शिक्षा दिली जाईल.

**विदूषक** - महाराज मी युवराजांचा लहानपणापासूनचा सोबती. मला आता तुमच्या जवळ राहणे शक्य नाही. मला पण त्यांच्या बरोबरच जाऊ द्या.

**राजा** - ठीक आहे. जा ! तोंड काळं करा. *(राजा व राणी जातात.)*

**युवराज** - चल विदूषका. आपण पाहूत आपलं नशीब काय आहे ते ?

**विदूषक** - चला युवराज, आपल्याला उद्या सकाळपर्यंत राज्याच्या बाहेर गेले पाहिजे. *(दोघे माशाचे भांडे घेऊन जातात.)*

**दवंडीवाला** - "ऐका हो ऐका" राजाज्ञेने असे फर्मान काढण्यात येत आहे

की, युवराज आणि विदूषक या दोघांना हद्दपार केलेलं आहे. तेव्हा राज्यातील कोणीही त्यांच्याशी संबंध ठेवू नये. जर तसे आढळले तर अत्यंत कठोर अशी शिक्षा दिली जाईल. तसेच उद्या पासून केव्हांही युवराज व विदूषक हे आपल्या राज्यात आढळल्यास त्यांना पकडून दरबारात हजर करावे. जो त्यांना पकडून आणेल त्याला १५ हजार सुवर्णमुद्रा इनाम म्हणून दिल्या जातील हो ऽऽऽ.

*(अंधार)*

*(समुद्र किनारा.होडीतून युवराज व विदूषक येतात.)*

विदूषक - युवराज, आपण पुन्हा त्याच जागेवर आलो आहोत. ही जागा आपल्या राज्याच्या हद्दीबाहेर आहे. बरं झालं. आपण ताबडतोब निघालो ते. तुम्ही दवंडी ऐकलीत ना ?

युवराज - हो. महाराज माझ्यावर फारच रागावलेले दिसतात, त्यांना राग येणार हे माहितीच होतं पण मी तरी काय करणार. जाऊ दे. चला, आधी या माशाला सोडून देऊत. बिचारा किती उपकाराच्या भावनेनं बघतो आहे बघ. *(माश्याला समुद्रात सोडतात. इतक्यात आवाज होतो व धूर निघतो आणि माशाचा यक्ष तयार होतो. विदूषक घाबरतो.)*

विदूषक - बापरे ! भूत ! भूत ! राक्षस ! राक्षस !

युवराज - कोण आहेस तू ? अचानक कसा काय प्रगट झालास ? *(तलवार उपसतात.)*

यक्ष - थांबा मी भूतही नाही किंवा राक्षसही नाही.

विदूषक - नाही, नाही, तू राक्षसच आहेस.

यक्ष - राक्षस काय असा दिसतो काय ?

विदूषक - आम्हाला काय माहित ? खरा राक्षस कुणी पाहिलाय ?

युवराज - खरं सांग कोण आहेस तू ?

यक्ष - युवराज मी एक यक्ष आहे. मी इतके दिवस सोनेरी डोक्याच्या माश्याच्या रुपात होतो. तुम्हीच माझा उध्दार केलात.

विदूषक - युवराज, हा थापा मारतो आहे. कां रे, तू यक्ष कशावरुन ?

यक्ष - तुझी खात्री पटण्यासाठी मी काय करावं ?

विदूषक - काहीतरी चमत्कार करुन दाखव.

यक्ष - ठीक आहे. तुला चमत्कारच पाहिजेत ना. तुझ्या खिशात बघ एक कोंबडीचे अंडे तयार झाले आहे. *(विदूषकाच्या खिशात अंडे तयार*

*झालेले)* तू तुझे कपडे नीट झटकून घातले आहेस ना, आता बघ मी तुझ्या कपडयामध्ये एक उंदीर सोडतो आहे. *(विदूषकाचा थयथयाट)* अजून खात्री पटत नाही? ठीक आहे. तुझा उजवा हात वर कर. आता खाली घेऊन दाखव बरं *(विदूषकाला हात खाली घेता येत नाही.)* आता तुझा हात खाली येईल. आता शेवटचा चमत्कार, तुझे दोन्ही पाय गच्च धरुन ठेव, बघ आता तुझे पाय ओढले जातील. *(विदूषक दणकण खाली आपटतो.)* झालं. पटली खात्री.

**विदूषक** - हो. हो. पटली खात्री *(कण्हतो)* आता चमत्कार पुरे बाबा

**युवराज** - ठीक आहे. तू यक्ष आहेस हे कबूल. पण तू अचानक कसा काय प्रगट झालास तू खरंच मासा होतास काय?

**यक्ष** - होय युवराज. मी आतापर्यंत सोनेरी डोक्याच्या माश्याच्या रुपात होतो. तुम्हीच मला पूर्वीच्या रुपात आणलंत.

**युवराज** - पण हे सगळं झालं कसं काय?

**यक्ष** - युवराज मी या समुद्र किनाऱ्यावरचा यक्ष आहे. एकदा मी गंमती गंमती मध्ये एका सश्याचा प्राण घेतला. तेवढ्यात वनदेवता प्रकट झाली आणि तिनं मला शाप दिला की, मी एक मासा बनेन. एवढंच नव्हे तर लोकांचं लागलीच लक्ष जाऊन त्यांनी मला मारावं म्हणून माझं डोकं सोन्याचं राहिलं. मी वनदेवतेची क्षमा मागितली. शेवटी तिने उःशाप दिला की जेव्हा एखादा सहृदय माणूस मला मारण्याकरता म्हणून पकडून नेईल व माझ्यावर दया दाखवून मला पुन्हा समुद्रात लोटेल. तेव्हाच मी पुन्हा पूर्वीच्या रुपात जाऊ शकेन. तू मला याच प्रकारे परत सोडलंस म्हणूनच मी परत या रुपात येऊ शकलो. मी तुझा अत्यंत ऋणी आहे.

**युवराज** - ठीक आहे. माझ्या नकळत का होईना मी पण तुझं कल्याण केलं आहे. आता तू पाहिजे तिथे जायला मुक्त आहेस.

**यक्ष** - नाही युवराज. मी आपले उपकार कसे काय फेडू तेच मला समजत नाही. तुमची मी कशी काय सेवा करु?

**युवराज** - सेवा वगैरे करण्याची काही गरज नाही. मी तुझ्यावर उपकार करायच्या भावनेनं काही केलेलं नाही. तू जाऊ शकतोस.

**विदूषक** - युवराज, खरंच जाऊ द्या त्याला इथून, मला त्याची भीती वाटते आहे.

**यक्ष** - विदूषका, भिण्याची काही गरज नाही. मघाशी मी तुझी फक्त गंमत केली, युवराज, माझ्या आयुष्यावर खरं म्हणजे तुमची

मालकी आहे. तुम्ही जा म्हणालात तरी मी जाणार नाही. कारण मला माहिती आहे की सध्याची तुमची दैन्यावस्था केवळ माझ्यामुळे झालेली आहे. म्हणून मी तुम्हाला वचन देतो की, जोपर्यंत तुम्ही पूर्ववत अवस्थेला येणार नाही, म्हणजे सुखी होणार नाही तोपर्यंत मी तुमची सेवा करत राहीन.

**युवराज** - पण यक्षा, तुझ्या सेवेचा काय उपयोग होणार? जोपर्यंत महाराजांचा राग नाहीसा होऊन ते मला परत बोलावणार नाहीत, तो पर्यंत माझी हीच अवस्था राहणार. आणि त्यांचा राग नाहीसा होणं ही अशक्यच गोष्ट आहे.

**यक्ष** - युवराज, त्यामध्ये अशक्य काय आहे? समजा जर आपण दुसऱ्या काही उपायांनी महाराजांची दृष्टी परत आणून दिली तर ते तुमच्यावर खूष नाही का होणार?

**युवराज** - पण त्यांची दृष्टी परत कशी येणार?

**यक्ष** - युवराज, एक लाल रंगाचे रत्न आहे. त्याला दिव्यरत्न असे म्हणतात. हे रत्न स्वयंप्रकाशीत आहे. या रत्नाचा प्रकाश जर महाराजांच्या डोळयात पडला तर त्यांची दृष्टी नक्कीच परत येईल.

**युवराज** - असं म्हणतोस. दे तर मग ते रत्न.

**यक्ष** - ते रत्न माझ्याजवळ नाही.

**विदूषक** - मग कुठं आहे ते सांगा म्हणजे आमचे युवराज ते नक्कीच मिळवतील. सांगा, कुठे आहे ते.

**यक्ष** - त्याचा नेमका ठिकाण मला माहित नाही.

**विदूषक** - अरेरे ! मग काय फायदा?

**युवराज** - मग ते रत्न आपल्याला सापडेल तरी कसे?

**यक्ष** - आपण त्या रत्नाचा पत्ता सहज मिळवू शकूत. या समुद्राच्या पलीकडच्या काठावर जे जंगल आहे त्या जंगलामध्ये एक चेटकीण राहते. आपण तिच्याकडे जाऊयात. तिच्याकडे एक जादूचा गोळा आहे, त्यामध्ये बघून ती आपल्याला रत्नाचा ठावठिकाणा सांगेल, मग आपण ते रत्न मिळवू.

**युवराज** - पण ती चेटकीण आपले काम करील कां?

**यक्ष** - हो नक्कीच करेल. नाहीतर मी तिला भाग पाडीन.

**विदूषक** - ते कसं काय?

**यक्ष** - मघाशीच तू माझे चमत्कार पाहिलेसच. जोपर्यंत मी समुद्राच्या जवळ आहे तोपर्यंत माझी शक्ती तशीच काम करते. मी तिच्या जादू खोटया ठरवीन. मग ती आपले काम ऐकेलच.

युवराज - चला तर मग लवकर. विदूषका होडी सोड आपली ( *विदूषक जाऊ लागतो)*
यक्ष - थांब विदूषका. होडीची गरज नाही. तुम्ही माझ्याबरोबर या. मी तुम्हाला पलीकडे नेतो.
विदूषक - तुझ्या जवळ काय जोरात जाणारी होडी आहे जादूची?
यक्ष - नाही, आपण पाण्यावर उभं रहायचं आणि जायचं.
विदूषक - पाण्यावर? मग आम्ही बुडणार नाही काय?
यक्ष - नाही. मी असतांना काय भीती?
*(यक्ष व युवराज समुद्रात उभे राहतात. विदूषक मोठया मिनतवारीने तयार होतो. तो शेवटपर्यंत घाबरलेलाच. यक्ष मंत्र म्हणतो. तिघेही आपोआप जातांना दिसतात.*

*(अंधार)*

## प्रवेश पाचवा

*(समुद्राकाठचे जंगल - उंदीर व मोर गाणे म्हणत नाच करत आहेत.)*
उंदीर - मोरा, आज इथे तो हत्ती आला नाही म्हणून आपण किती आनंदाने खेळू शकलो नाही? आता जा तू, मी पण जातो माझ्या बिळात. *(इतक्यात हत्ती येतो व दोघांच्या मागे लागतो. धावपळ सुरु होते. शेवटी वाचवा वाचवा असे ओरडतात. इतक्यात पुर्वीसारखे युवराज, विदूषक, व यक्ष येतांना दिसतात.)*
युवराज - यक्षा, अरे त्या हत्तीला आवर. तो उगीचच त्यांना मारतो आहे. उंदीर व मोर तिघांच्या पाठीमागे लपतात. हत्ती अंगावर येतो. विदूषक घाबरलेला. यक्ष एका हाताने हत्तीला मागे ढकलतो. व मंत्राने खाली बसावयास लावतो. उंदीर व मोर टाळया वाजवून ओरडतात, हत्तीला चिडवतात. *(विदूषक पण त्यात सामील होतो.)*
उंदीर - यक्ष महाराज, तुम्ही आमचे प्राण वाचवलेत. आता तुम्ही सांगाल ती सेवा करावयास मी तयार आहे.
यक्ष - आम्हाला इथल्या चेटकीणीचं घर दाखवा.
उंदीर - चला. आम्ही येतो बरोबर, पण महाराज, त्याआधी या हत्तीची पुरती खोड मोडा. त्याला आम्हाला दोघांना घेऊन एक चक्कर मारायला सांगा. *(यक्ष दोघांनाही पाळी पाळीने हत्तीवर बसवून चक्कर मारावयास लावतो. नंतर सर्व निघतात. मोर पुढे मागे हत्तीच्या पाठीवर उंदीर त्यामागे सगळे)*

# प्रवेश सहावा

**चेटकीण** - *(विकट हास्य)* मी इथली चेटकीण आहे. हे माझे घर आहे. माझ्या घरात यायची कुणाची हिंमत नाही. सगळे मला घाबरतात. सगळे प्राणी माझं ऐकतात. कुणी माझं ऐकलं नाही की मी त्याच्यावर जादू टाकते. जर मी जादू टाकली तर तुमच्या डोक्यावर शिंग येईल. जर मी ठरवलं तर तुम्हाला शेपूट येईल. पाहिलंत मला काय काय जादू येतात ते. आता मी एक नवीन काढा तयार केला आहे. कबुतराचे डोळे, ३-४ कावळे, सिंहाची आयाळ आणि काटेरी सायाळ, माकडाची जीभ, आणि हत्तीचे शेपूट, घुबडाचे डोळे आणि मोराचे पाय, या सगळयांचा बनवलाय काढा, जो पिईल हा काढा त्याची येईल मजा. तो होईल हलका हलका आणि जाईल उडत आकाशात. थांबा कोणीतरी येतंय. अरे उडणाऱ्या कावळया, जा बघ येथून, आणि कोण येते ते बघून ये. *( थोडया वेळाने कावळयाचा आवाज येतो. तो नीट ऐकून)* अस्सं तीन माणसं येताहेत. चांगलं झालं आता त्यांनाच पाजीन हा काढा ? *(आधी मोर, उंदीर व विदूषक येतात)* काय रे उंदरा तू माझ्या घरात कसा काय आलास ?

**उंदीर** - बाईसाहेब याचं तुमच्याशी काम आहे. मी फक्त घर दाखवायला आलो आहे.

**चेटकीण** - कोण आहेस तू ? काय काम आहे ?

**विदूषक** - मी... मी ... विदूषक आहे. माझं काही काम नाही. युवराजाचं काम आहे.

**चेटकीण** - पण तुला एवढं घाबरायला काय झालं ? ये, पुढे ये. हा काढा पी.

**विदूषक** - काढा ? वा ! वा ! नाही तरी मला फार भूक लागली होती. अहो अख्ख्या समुद्रावरुन आलो पण प्यायला पाणीसुध्दा मिळाले नाही. सगळं खारट पाणी. आता काढा तर काढा. काहीही चालेल द्या. *(काढा पिऊ लागतो. चेटकीण हसते.)* अरे मला हे काय होतंय ? मला अगदी हलकं हलकं वाटतंय. मी आता हवेत तरंगणार असं वाटतंय *(इतक्यात यक्ष व युवराज येऊन ते सारं पाहतात. यक्ष मंत्राने काढयाचा प्रभाव नाहीसा करतो.)*

**चेटकीण** - *(चिडते)* असं कसं काय झालं ? माझा काढा चुकला वाटत. पण ते शक्यच नाही. नक्कीच दुसऱ्याकुणी तरी मंत्र टाकला असणार. थांबा तुमच्या तिघांवर मंत्र टाकते आणि तुमचा बर्फ करते. *(यक्ष पुन्हा मंत्राने जादू खोटी पाडतो. असे दोन तीन वेळेस होते.)* नक्कीच तुमच्या मध्ये कुणीतरी जादूगार आहे. थांबा, मी आता आत जाऊन कवटी घेऊन येते आणि जंगलातल्या सगळ्या सिहांनाच तुमच्यावर सोडते. *(आंत जाऊ लागते.)*

**यक्ष** - थांब चेटके मी यक्ष आहे. माझे तुझ्याशी महत्वाचे काम आहे. तेवढयासाठीच आम्ही आलो आहोत.

**चेटकीण** - अरे जा जा! तुमचे काम करायला मी काय तुमची नौकर आहे. थांब. आता मी आतून कवटी घेऊन येते आणि मंत्र टाकून सिंहांना बोलावते.

**यक्ष** - चेटके ऐक माझं, नाहीतर मी जादू टाकून तुला बुटकंच करुन टाकीन. *(चेटकीण न ऐकता आंत जाऊ लागते. यक्ष मंत्र म्हणतो. चेटकीण परत येते. तेव्हा बुटकी झालेली रडत रडत येते.)*

**विदूषक** - पाहिलंत युवराज नी आता काय म्हणाली ते ? मी आत जाऊन कवटी घेऊन येते. म्हणजे चेटकीण इथे आणि तिची कवटी मात्र आत गंमतच आहे. अरे पण ही काय नवीन गंमत ?

**चेटकीण** - यक्षा, माफ कर मला. माझं चुकलं. मला पुन्हा पहिल्यासारखी ऊंच कर. *(विदूषक, मोर व उंदीर तिला चिडवतात. ती सगळयांची माफी मागते.)*

**यक्ष** - मग तू आधी आमचे काम कर.

**चेटकीण** - काय काम आहे ? मी नक्की करीन. पण मला ऊंच कर.

**यक्ष** - आम्हाला दिव्य रत्न पाहिजे आहे. त्याचा पत्ता सांग.

**चेटकीण** - पण मी पत्ता कसा काय शोधणार ?

**यक्ष** - का ? तुझा जादूचा गोलक कुठे आहे ?

**चेटकीण** - अरे तो आत्ता माझ्याजवळ नाही. १५दिवसापूर्वी एक वेताळ माझ्या कडे आला होता. त्याने मला काही कोडी घातली होती. मला ती सोडवता आली नाहीत. मी हरले. म्हणून तो जादूचा गोलक घेऊन गेला. तुम्ही तो गोलक परत आणा, म्हणजे त्यात बघून मी पत्ता सांगेन.

**युवराज** - पण तो वेताळ आहे कुठे ?

**चेटकीण** - तो याच जंगलात राहतो. हा उंदीर दाखवेल पत्ता.

उंदीर - मला माहिती नाही, पण त्या हरला माहित असेल. चला त्याला घेऊन जाऊ.

चेटकीण - यक्षा, पण मला पूर्वीसारखं करण्याचं काय झालं?

यक्ष - तू होशील पूर्वी सारखी पण आम्ही घरातून बाहेर गेल्यावर मात्र पुन्हा आम्हाला त्रास देऊ नको.

चेटकीण - नाही, नाही, तुम्ही या. मी तुमचे काम नक्की करीन.

*(सर्व जातात. चेटकी अर्धी मोठी होते.)*

चेटकीण - वा! वा! मी पुन्हा ऊंच होऊ लागले. *(उडया मारत आत जाते.)*

*(अंधार.)*

## प्रवेश सातवा

*(सर्व येतांना दिसतात. हत्ती थांबतो.)*

यक्ष - हेच आहे कां वेताळाचे ठिकाण. *(हत्ती मान हलवतो.)*

युवराज - पण इथे तर कुणीच दिसत नाही. थांबा. आपण त्यान्ना बोलावूत.

वेताळा - *(सगळे हाका मारतात. अचानक हसण्याचा आवाज येतो व डोक्यावर सापळा तरंगू लागतो. युवराज व यक्ष सोडून बाकी सर्व घाबरतात.)*

वेताळ - काय आहे? कुणी मला जागं केलं?

युवराज - वेताळा मी युवराज आहे, मला जादूचा गोलक पाहिजे.

वेताळ - पण मी तो जिंकून आणला आहे. तो तुम्हाला मिळणार नाही. तुम्हाला पण माझ्याबरोबर पैज लावावी लागेल.

युवराज - कसली पैज?

वेताळ - मी तुम्हाला काही कोडी सांगेन. तुम्ही पण सांगा. ज्याला उत्तर देता येणार नाही तो हरला. मला उत्तर देता आले नाही तर मी जादूचा गोलक देईन. पण तुम्ही हरलात तर काय द्याल?

यक्ष - तुला काय पाहिजे ते मिळेल.

वेताळ - तुम्हाला माझे गुलाम बनावे लागेल. कबूल? *(सर्व विचार करतात नंतर कबूल)* ठीक आहे. ऐका, पहिले कोडं कोण सांगणार?

यक्ष - आधी तू तीन कोडी सांग. मग आम्ही तीन कोडी सांगूत.

वेताळ - *(हसतो)* ऐका माझ पहिलं कोडं - चार खांब घेतले, त्यावर

ठेवला चिखलाचा गोळा, आकार भला मोठा, दुरुन दिसतो ढग काळा.
*(सगळे विचारात. हत्ती स्वतःकडे खुण करतो)*
**सगळे** - हत्ती! हत्ती!
**वेताळ** - बरोबर. पण एका कोडयाचं उत्तर सापडलं म्हणून काय झालं? आता दुसरं कोड ऐका. शेपटीवर हिरे, रत्नं मिरवतो, पावसाला पाहून नाचतो. सांगा कोण? *(त्या वेळेस मोर नाचतो. सगळे - मोर)*
बरोबर आहे. आता अगदी कठीण कोडं सांगतो. ऐका, मोठ्ठा वाडा, त्यात १२ दालनं. प्रत्येक दालनात चार पेटया प्रत्येक पेटीत सात छोटया छोटया पेटया, प्रत्येक छोटया पेटीत दोन कप्पे, १ काळा, १ पांढरा - काळयात पांढरं रत्न आणि पांढऱ्यात लाल पिवळं माणिक - चला सांगा उत्तर *(सगळे विचारात)* लवकर सांगा, नाही तर हरलात म्हणून कबूल करा.
**युवराज** - मी सांगतो उत्तर. मोठा वाडा म्हणजे वर्ष, त्यात १२ दालनं म्हणजे १२महिने, त्यामध्ये ४ पेटया म्हणजे ४ आठवडे, प्रत्येकात ७ लहान पेटया म्हणजे ७ वार, प्रत्येक पेटीत काळा व पांढरा कप्पा म्हणजे दिवस आणि रात्र. पांढरं रत्न म्हणजे चंद्र, आणि लाल पिवळं माणिक म्हणजे सूर्य.
*(सगळे शाब्बासकी देतात.)*
**वेताळ** - ठीक आहे. आता तुम्ही तीन कोडी सांगा?
**विदूषक** - तीन कशाला तुला एकच कोडे पुरे आहे.
**वेताळ** - अरे जा. मला माहित नाही असं जगामध्ये एकही कोड नाही.
**विदूषक** - अस्सं. *(विचार करुन)* ऐक तर मग--
लांबपण आहे, आखूडपण आहे, उंच पण आहे, बुटकी पण आहे, मऊपण आहे, कठीण पण आहे, जवळ पण आहे, दूरपण आहे, पातळ पण आहे, घट्ट पण आहे, लाल पण आहे आणि हिरवी पण आहे अशी वस्तू कोणती?
*(सगळेच विचारात, वेताळाला उत्तर सुचत नाही.)*
**वेताळ** - मी हरलो. उत्तर सांगा.
**विदूषक** - उत्तर सांगायचं काही ठरलं नव्हतं. तू शोधून काढ.
**यक्ष** - वेताळा तू हरला आहेस. आता तो गोलक दे.
**वेताळ** - त्या झाडाच्या ढोलीतून घ्या. मी आता या कोडयाचं उत्तर शोधून काढीन आणि मग पुन्हा पैज लावायला येईन. जातो मी *(उडून जातो.)*

*(यक्ष व युवराज गोलक घेऊन येतात. सर्व विदूषकाला शाब्बासकी देतात.)*

**युवराज** - पण विदूषकाच्या त्या कोडयाचं उत्तर आता तरी सांग आम्हाला. कोणालाच ते कळलं नाही. *(सर्व मान हालवतात व आग्रह करतात.)*

**विदूषक** - *(हसतो)* अहो तुम्हाला उत्तर सापडणार नाही. कारण अशी वस्तू नाहीच कोणती मी वेताळाची गंमत केली. आता बस म्हणावं आयुष्यभर उत्तर शोधीत. दुसरा मार्गच नव्हता, कारण खर कोडं सांगितलं असतं तर त्याला उत्तर सापडलं नसतं कां? *(सगळे हसतात. जायला निघतात.)*

*(अंधार)*

## प्रवेश आठवा

*(चेटकिणीचे घर)*

**चेटकीण** - *(पुन्हा पहिल्या सारखी ऊंच)* वा! वा! मी पुन्हा पहिल्यासारखी झाले. काय पण बाई त्या यक्षाची जादू. आता मी नाही त्याच्याबरोबर भांडणार. त्यांनी तो जादूचा गोलक आणला तर किती बरं होईल *(सगळे आनंदात येतात.)*

**युवराज** - चेटके, हा घे गोलक, सांग आता पत्ता.

**चेटकीण** - *(गोलक घेत)* अग बाई! कसा काय दिला त्याने परत? वेताळ हरला? कुणी हरवलं त्याला *(विदूषक - मी)* तू. मला नाही खरं वाटत, काय पण ध्यान दिसतंय.

**यक्ष** - तो खरंच सांगतोय चेटके, त्यानेच कठीण असं कोडं घातलं.

**चेटकीण** - अस्सं. कोणतं कोड घातलंस रे बाबा?

**युवराज** - *(विदूषकाला अडवतो)* ते महत्वाचं नाही. आधी रत्न कुठे आहे ते सांग *(चेटकीण गोलकात रोखून बघते. सगळे उत्सुक)*

**चेटकीण** - *(मंत्र म्हणते)*

अबलख बखलख, घोडा तिघलख
आकाश पाताळ, भूऽत वेताळ
सनिलार जेस्मिन, सिल्कान जिस मालिये
सेरीपी इस्कहार एली.
अटपट अटपट अटपट इटांग

चटपट चटपट चटपट चिटांग
चेटकीणीची आज्ञा सुटे
दाखव रे गोलकां रत्न कुंठे ?

*(गोलक प्रकाशीत होतो. त्यामध्ये बघत)*

सापडला! रत्नाचा पत्ता सापडला! ते रत्न आहे किथरॉन नावाच्या राज्यात. इथून तीन समुद्र पार केले की एक जंगल लागेल. त्या जंगलाच्या पुढे हे राज्य आहे. तिथला राजा आहे झांबो. त्याने हे रत्न कुठे तरी लपवून ठेवलं आहे. जा! त्या राजाकडून ते रत्न मिळवा.

**युवराज** - ठीक आहे, चला रे आपण जाऊयात. चेटके तू आम्हांला मदत करशील कां.

**चेटकीण** - मी काय मदत करणार? त्या प्रांतात माझी जादू चालणार नाही. माझी जादू या जंगलापुरतीच चालते. या यक्षालाच जमेल ते.

**यक्ष** - माझी मंत्रशक्ती पण समुद्राच्या जवळ असेपर्यंतच चालते. मी तुला तीन समुद्राच्या पार त्या जंगलाजवळ मंत्रसामर्थ्याने घेऊन जातो, त्यापुढे पाहूत आपण. काही तरी मार्ग सापडेलच.

**चेटकीण** - हे बघ, हा ताईत घे, जेव्हा तुला अगदी गरज पडेल तेव्हा हा आपटून फोड. म्हणजे मी तिथे येईन. मात्र लक्षात ठेव. मी फक्त एकदाच उपयोगी ठरु शकेन.

**युवराज** - *(ताईत घेतो)* बरंय मित्रांनो. जातो मी.

**उंदीर** - थांब *(शेपटीचा केस देतो)* जेव्हा तुला गरज वाटेल तेव्हा हा केस तोड म्हणजे मी तिथं येईल *(मोर पीस तोडून देतो)* हा मोराचा पंख पण राहू दे आणि हा हत्तीच्या शेपटीचा केस. जेव्हा तू याचे तुकडे करशील तेव्हा हे प्रगट होतील. मात्र फक्त एकदाच ते शक्य आहे हं.

*(युवराज तिन्ही वस्तू घेतो, सगळ्यांचा निरोप घेतो आणि विदूषक, राजपूत्र तिथून जातात.*

**(पडदा)**

**(अंक पहिला समाप्त)**

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

*(रंगमंचावर यक्ष, विदूषक व युवराज येतांना दिसतात. समुद्रातून येतात नंतर डायसवरुन खाली उतरतात.)*

**विदूषक** - अरेरे! इतका सुखाचा प्रवास आता संपणार आता यापुढे फक्त जंगल.

**यक्ष** - युवराज मी तुम्हाला मंत्र सामर्थ्याने इथपर्यंत तर घेऊन आलो. आपण तांबडा, हिरवा आणि निळा असे तीन समुद्र पार केले आहेत. आता यापुढे जंगलाचा भाग सुरु होणार. म्हणजे यापुढं मला मंत्रशक्ती वापरता येणार नाही. तेव्हा देवच आपले रक्षण करो.

**युवराज** - यक्षा, काळजी कशाला करतो, जोपर्यंत आपल्या बरोबर शस्त्र आहे. तोपर्यंत आपल्यावर काहीही संकट आले तरी मी सर्वांचे रक्षण करीन.

**यक्ष** - पण युवराज तुम्ही एकटे किती लढणार, मी सगळी कामे मंत्रशक्तीने करतो त्यामुळे मला शस्त्रसुध्दा चालवता येत नाही.

**युवराज** - कांही हरकत नाही, हा विदूषक आहे ना.

**विदूषक** - हो! हो! मी आहे ना, माझ्यासारखा शूर दुसरा सापडणार नाही.

**यक्ष** - अस्सं! म्हणजे तू युवराजापेक्षा जास्त शूर आहेस काय?

**विदूषक** - तसं नाही. ते पहिले आहेत, दुसरा सापडणार नाही असे मी म्हणालो.

**यक्ष** - बरं मग तू पुढे हो बरं कां *(विदूषक जाऊ लागतो)* पण लक्षात ठेव या जंगलात वाघसिंह आहेत. *(विदूषक घाबरतो.)* जा. जा. तू एवढा शूर आहेस. तुला कशाची भीती म्हणा. हं, जा *(विदूषक घाबरत घाबरत आत जातो. कसला तरी आवाज, विदूषक घाबरत, ओरडत बाहेर येतो आणि युवराजाला मिठी मारतो.)*

**विदूषक** - बापरे! बाप! वाघ....वाघ...वाघ आहे तिथं. *(दोघेही हसतात.)*

*(वाघाची डरकाळी, युवराज आतमध्ये बाण मारतो.)*

**विदूषक** - मेला, मेला वाघ *(आत जाऊन येतो.)* बघ रे यक्षा मी जाऊन

वाघाला मारुन आलो, आहे की नाही मी शूर?
विदूषक - पण इथे रस्ता तर काही दिसतच नाही.
युवराज - अरे रस्ता आपल्याला तयार करावा लागेल. चल या तलवारीने आपण झुडपं आणि वेली तोडून जाऊत.
यक्ष - हे बघ विदूषका, हा अनोळखी प्रदेश आहे. कुणी रस्ता चुकायला नको. म्हणून तिघेही एकत्रच राहूत. *(विदूषक बरं म्हणून युवराजाचा झगा सोडवतो. तिघे जातात.)*

## प्रवेश दुसरा

*(रंगमंचावर अंधूक प्रकाश. झाडे तोडत आलेले, अंगावर पाने इत्यादि)*
विदूषक - आँ - - हा मघापासून आपण चालतोय. एवढी एकच मोकळी जागा सापडली बघा आपल्याला. मला वाटतं आपण इथं थांबूयात.
यक्ष - खरंच युवराज, मलाही वाटतं आपण इथेच आराम करावा.
युवराज - ठीक आहे, नाहीतरी बऱ्यापैकी मोकळी जागा दिसते आहे ही.
विदूषक - *(तिघे बसतात.)* बापरे. काय खरचटलंय मला. काय पण हे जंगल, मघाशी मी फांदी म्हणून हात लावला तर साप निघाला बरं झालं तलवार होती म्हणून मारला तरी.
युवराज - कुणी? तू मारला का साप?
विदूषक - नाही नाही. तुम्हीच मारलांत, पण तलवार होती ते बरं झालं की नाही, *(जांभई येते)* आ...ह मला तर झोप येते आहे. मला वाटतं आपण तिघंही झोपी गेलो आणि एखादं जनावर आलं म्हणजे? अंधारात कळणारसुध्दा नाही.
युवराज - मला वाटतं आपण एकेकजण पहारा देऊत. म्हणजे सर्वांनाच थोडी थोडी झोप मिळेल.
विदूषक - हे पहा मला एकदा झोप लागल्यावर पुन्हा मध्येच उठायचं आणि परत झोपायचं हे कसं काय जमणार म्हणून मी दुसरा नाही. आणि तिसरा म्हणजे तोपर्यंत अंधार जास्तच वाढणार म्हणून ते सुध्दा नको. म्हणून सगळ्यात आधी मीच पहारा करतो.
यक्ष - चालेल. पण लक्ष नीट ठेव, नाहीतर कुणीतरी यायचं आणि तू झोपलेला असायचास. आणि भिऊसुध्दा नकोस बरंका *(विदूषक छे, छे म्हणतो पण मनातून घाबरलेला. यक्ष व युवराज झोपतात. कसल्या*

*तरी आवाजाने विदूषक घाबरतो. दोघांना उठवतो.)*

**युवराज** - काय झालं? कशाला उठवलंस? *(विदूषक गप्प. सगळीकडे तो आणि यक्ष पाहून येतात.)* काहीच तर नाही मग का उठवलंस.

**विदूषक** - *(घाबरलेला)* नाही...म्हणजे...दुसऱ्याला केव्हां उठवायचं ते नाही सांगितलंत. *(दोघे मारू लागतात.)*

**यक्ष** - एवढं समजत नाही? थोडया वेळाने उठव, आणि आता पुन्हा जर उगाचच उठवलंस तर लक्षात ठेव. *(दोघे पुन्हा झोपतात. थोडया वेळाने आधी आवाज येतो. व नंतर एक इसम स्टेजवर येतो. त्याला भयानक थंडी वाजत आहे. त्याचं नांव थंडगार त्याच्या आवाजाबरोबर विदूषक भयानक घाबरतो.)*

**विदुषक** - कोण आहे -- क -- क -- क -- कोण?

**थंडगार** - *(अंगावर तीन चार घोंगड्या)* हु--हु--हु--घोंगडं आहे कां

**विदुषक** - बापरे भूत -- *(ओरडतो. दोघेही उठतात)*

**युवराज** - कोण आहेस, काय पाहिजे तुला.

**थंडगार** - मी--मी--थंडगार, हू--हू--हू मला फार थंडी वाजतेय.

**यक्ष** - थंडी. आम्हाला तर नाही वाटत थंडी, मग तुलाच कशी काय?

**थंडगार** - मला फार थंडी वाजते, रोज एकदा तरी मी शेकोटीत उभा राहतो.

**विदुषक** - शेकोटीत? मला वाटतं शेकोटीबाहेर म्हणायचं असेल तुला.

**थंडगार** - नाही, शेकोटीतच उभा राहतो मी, इथल्या राजाने माझ्यावर जादू टाकली आणि मला असं बनवलं. मी स्वत: मोठा जादूगार होतो. पण या राजाने मला हरवलं आणि माझ्यावर जादू टाकली. दहा वर्ष झाली त्या गोष्टीला तेव्हापासून मी असा हिंडतोय. काही केलं तरी थंडी थांबतच नाही.

**विदुषक** - मग तु कधी बर्फ खातच नसशील.

**युवराज** - गप रे विदुषका. पण हे पहा थंडगार आमच्याजवळ तर धोंगडं वगैरे काही नाही. पण तुझी ही थंडी कधीच थांबणार नाही कां?

**थंडगार** - त्यावर फक्त एकच उपाय आहे. त्या राजाजवळ एक दिव्य रत्न आहे. त्याचा प्रकाश माझ्या अंगावर पडला तर मी पुन्हा पहिल्यासारखा होईन.

**यक्ष** - दिव्य रत्न? पण ते आहे कुठे?

**थंडगार** - ते या राजानेच कुठेतरी ठेवलं आहे. ते कुठे आहे हे कुणालाच माहित नाही. मी तेच शोधतोय १० वर्षापासून.

**युवराज** - हे बघ थंडगार, आम्हाला पण तेच दिव्य रत्न पाहिजे आहे. तेव्हा असं करु की तू पण आमच्याबरोबर चल म्हणजे आपल्याला एकत्र राहून प्रयत्न करता येतील.

**थंडगार** - पण माझी जादूसुध्दा त्या राजाने काढून घेतली.

**युवराज** - हरकत नाही, तरीसुध्दा एकट्यापेक्षा चौघे केव्हाही चांगलेच.

**विदुषक** - होय थंडगार. आपण सगळे एकत्रच जाऊ. मंजूर आहे का? मग मिळव हात. *(थंडगार हात पुढे करतो, विदुषकाने हात धरल्याबरोबर विदुषकाला भयानक थंडी वाजू लागते. युवराज व यक्ष हसतात. (विदूषक हात सोडवून घेतो.)* तुम्ही पण मिळवा हात.

**यक्ष** - नको, चला आपण पुढे जाऊयात.

**विदूषक** - आँ. आणि माझी झोप तशीच राहिली ना.

**युवराज** - जाऊ दे आता. पुढच्या मुक्कामाच्या ठिकाणी झोप तू.

**थंडगार** - चला मी तुम्हांला जवळचा रस्ता दाखवतो. चल विदूषका. *(विदूषक आधी हात पुढे करतो. मग घाबरुन दूर होतो. सगळे निघतात.*

## प्रवेश तिसरा

*(दुसरे स्थळ, एका कोपऱ्यांत एकजण बसलेला - लांबहात्या चौघेजण येतात, विदूषक थकलेला, जांभया देतो आहे.)*

**विदूषक** - युवराज, आता मात्र मी फारच थकलो आहे, इथे बऱ्यापैकी जागा दिसते आहे, मी झोपतो थोडा वेळ, तुम्ही पण आराम करा. नाही, पहारा करा.

**युवराज** - बरं झोप. चल यक्षा, आपण काय करायचं त्याची योजना आखूयात.

**विदूषक** - झालं, म्हणजे तुम्ही आता बडबड करत रहाणार वाटतं. मग आता असं करा, तुम्ही या कोपऱ्यात बसा मी तिकडच्या कोपऱ्यात झोपतो. आणि जरा हळू बडबड करा बरं कां *(तिघे एका कोपऱ्यात कुजबुजत बसतात. विदूषक लांबहात्याकडे न पाहताच त्याच्याजवळ जाऊन झोपतो. लांबहात्या शुक शुक करतो. विदूषक घाबरुन गप्प, नंतर ओरडतो, तिघे जवळ येतात.)*

**युवराज** - काय झालं? *(लांबहात्याला)* कोण आहेस तू?

**लांबहात्या** - मी तुमचा मित्रच आहे असं समजा. माझे नांव लांबहात्या.

**यक्ष** - पण तू इथे एकटा बसून काय करतो आहेस.

**लांबहात्या** - मी इथे शेजारीच राहतो, कंटाळा आला म्हणून इथेच झोपलो होतो.

**युवराज** - म्हणजे आता जंगल संपले काय ?

**थंडगार** - हो युवराज, ही राज्याची हद्द आहे.

**विदूषक** - पण तू असा राज्याच्या हद्दीबाहेर का राहतोस.

**लांबहात्या** - म्हणे की मी चोरी केली, आणि तीही राजवाडयात.

**थंडगार** - पण राजवाडयात तर फार कडक पहारा असतो. परवानगीशिवाय मुंगी पण आतमध्ये जाऊ शकणार नाही. मग तू कसा काय जाणार चोरी करायला.

**लांबहात्या** - अहो हे इथल्या प्रधानाचे कारस्थान. त्याने माझ्यावर खोटा आळ आणला. आणि मला हद्दपार करुन माझी सगळी संपत्ती बळकावली. फार दुष्ट आहे तो. म्हणून मी मुद्दाम वेष बदलला, दाढी मिशा काढल्या, कोणी ओळखू नये म्हणून, आणि आता इथे राहतो आहे गुपचूप.

**युवराज** - पण लोकांनी तू चोरी केली यावर विश्वास कसा ठेवला ?

**लांबहात्या** - अहो, सगळ्यांना माहिती आहे की माझा हात वाटेल तितका लांब होतो म्हणून -- त्यामुळे त्यांचा विश्वास बसला.

**सगळे** - *(दचकतात)* काय म्हणालास ?

**लांबहात्या** - खरंच सांगतोय मी. त्यामुळे लोकांना वाटलं की मी राजवाडयात न जाताच चोरी केली असली पाहिजे.

**विदूषक** - काहीही थापा मारतोस काय ? म्हणे हात लांब होतो.

**लांबहात्या** - असं ? मग असं करा तुम्ही जरा लांब उभे रहा बरं *(सगळे दूर जातात. लांबहात्या आपला हात त्यांच्यापर्यंत लांबवतो. सगळे आश्चर्यचकीत. विदूषक आधी घाबरतो. नंतर हात लावून पाहतो.)* पटली खात्री ? *(सगळे हो म्हणतात.)* मग हात मिळवा. *(विदूषक हात मिळवतो. लांबहात्या हात मागे घेऊन त्याला ओढतो.)* पण तुम्ही कोण ?

**विदूषक** - मी विदूषक आहे. हे युवराज आहेत. हा यक्ष आहे. हा आहे थंडगार. याच्याशी हात मिळव ना. *(लांबहात्या हात मिळवतो. त्याला थंडी वाजू लागते. तो हात मागे पुढे करतो. विदूषक हसतो.)*

**युवराज** - पुरे, पुरे, सोडा हात. गंमत पुरे झाली. चला आपण राजवाडयाकडे जाऊत. लांबहात्या तुला पण प्रधानाचा राग आला आहे ना. मग तू पण आमच्या बरोबर चल. आम्ही चाललोत राजाकडून दिव्य-रत्न

मिळवायला.

लांबहात्या - दिव्य रत्न? अहो तो राजा सुध्दा फार दुष्ट आहे तो काही देणार नाही. ते रत्न तुम्हाला. अहो तो फार लोकांना रत्न देतो असे सांगतो, पण आधी फार अवघड पण सांगतो. जर पण पूर्ण करता आला नाही तर तो सरळ शिरच्छेदच करतो. आतापर्यंत ज्यांनी प्रयत्न केले ते सगळे मारले गेले.

विदूषक - बापरे! शिरच्छेद! आता मी काय करु? युवराज आपण सगळ्यांनी राजवाडयात नाही जायचं.

यक्ष - काय? एवढा कसा भित्रा तू? *(सगळे चिडून अंगावर येतात.)*

विदूषक - थांबा. मी म्हटलं राजवाडयात जायचं नाही म्हणजे आताच जायचं नाही. कारण माझी झोप अजून झाली नाही. त्याआधीच त्यांनी शिरच्छेद केला म्हणजे? डोकं नसतांना मी झोपणार कसा?

युवराज - शहाणा आहेस फार. बरं लांबहात्या तू पण येणार कां?

लांबहात्या - हो, हो कां नाही. आपण सगळे मिळून जाऊत.

विदूषक - पण त्या आधी मला कुणी थोडीशी झोप घेऊ देणार आहे का? *(जांभया देतो.)*

लांबहात्या - चला, इथे शेजारीच माझे घर आहे. तिथेच झोपा सर्व. सगळे जाऊ लागतात- *(इतक्यात राजाचे सैनिक भाले घेऊन येतात.)*

१ला सैनिक - थांबा. कुठेही जायचे नाही. *(सगळे दचकतात. युवराज तलवार उपसतो.)* हे पहा तलवारीचा काही उपयोग नाही.

युवराज - कोण आहात तुम्ही?

२रा सैनिक - आम्ही राजाचे सैनिक आहोत. राजाने तुम्हाला आताच्या आता राजवाड्यात बोलावले आहे.

विदूषक - आता! अहो पण माझी झोप नाही झाली. माझं डोकं -

सैनिक - मस्करी बंद करा, आणि ताबडतोब चला.

यक्ष - पण आम्ही इथे आहोत हे त्याला कसं काय कळलं?

सैनिक - *(हसतो)* आमच्या महाराजांपासून कोणतीही गोष्ट लपून रहात नाही. तुम्ही हद्दीजवळ आलात, तेव्हाच एका घुबडाने ती गोष्ट महाराजांना येऊन सांगितली.

विदूषक - घुबडाने? म्हणजे तुमच्यापैकी कुणी सांगितली?

सैनिक - चूप! घुबडानं म्हणजे खऱ्या घुबडाने.

विदूषक - अस्सं! म्हणजे तुमच्या राजाचं घुबड मित्र आहे वाटतं.

**सैनिक** - आता एक शब्द बोललात तर इथल्या इथे तुमचा शिरच्छेद केला जाईल.
**विदूषक** - शिरच्छेद! नको. माझा शिरच्छेद झाला तर मी झोपतांना उशीवर काय ठेवू?
**युवराज** - पण समजा आम्ही यायला नकार दिला तर?
**सैनिक** - जरा तिकडे नजर टाका, बघा केवढं सैन्य उभे आहे ते. चला चलता की नाही लौकर. आणि लढण्याचा प्रयत्न करु नका. उगाच मारले जाल.
**यक्ष** - युवराज इतक्या लोकांसमोर आपला निभाव लागणार नाही. त्यापेक्षा आपण त्यांच्याबरोबर जाऊ आणि राजालाच सांगू काय सांगायचंय ते.
**युवराज** - नाहीतरी आपण तसंच ठरवलं होतं ना.
**विदूषक** - हे पहा तुम्हाला जायचंच असेल तर जा. पण मी मात्र आता इथून हलणार नाही. मला फार झोप---- *(उभ्याउभ्याच झोपतो.)*
**सैनिक** - कसा नाही येत ते मी पाहतो. चल रे धर त्याला.
**विदूषक** - *(दोघे सैनिक जवळ आल्यावर एकदम जागा होतो.)* हे पहा तुम्हाला मला न्यायचंच आहे ना. तर मग त्याआधी ह्या माझ्या भावाला पकडून न्या. मी गुपचुप येतो मग. *(दोघे सैनिक थंडगारला धरतात त्यांना पण थंडी वाजू लागते. विदूषक हसतो. सैनिक चिडून हत्यारे उगारतात.)*
**युवराज** - थांबा, मारामारीची गरज नाही. आम्ही सगळे येतो. चला.

## प्रवेश चौथा

*(स्थळ राजवाडा, राजा, प्रधान)*

**राजा** - प्रधानजी आताच घुबडाने येऊन सांगितलं की, आमच्या सैनिकांना त्या लोकांना आपल्या बरोबर आणले आहे. त्यापैकी दोघे आपल्या राज्यातले असू शकतात. पण तिघांचे पोषाख मात्र संपूर्ण वेगळे आहेत. ते तिघे आपल्या राज्यातले असूच शकत नाहीत.
**प्रधान** - पण महाराज कोण असावेत ते लोक?
**राजा** - ते समोर आल्यावर कळेलच पण ज्याअर्थी ते समुद्र आणि जंगल पार करुन आले आहेत, त्याअर्थी नक्कीच त्यांचं काही तरी महत्वाचं काम असणार. आता त्यांचा हेतू चांगला की वाईट हे कुणास ठाऊक?
**प्रधान** - महाराज कुणी मांत्रिक वगैरे तर नसतील?
**राजा** - *(हसतो)* प्रधानजी तुम्हाला माहित नाही का की या राज्याच्या

हद्दीत माझ्याशिवाय कुणाचीच मंत्रशक्ती चालू शकत नाही ते. जेव्हा आपल्या अपोलो देवाकडून मला मंत्रशक्ती प्राप्त झाली तेव्हाच मी हा सगळा प्रदेश भारुन टाकला आहे. हे पहा, आपले सैनिक आलेच. *(सैनिक प्रणाम करतात.)*

**सैनिक** - महाराज, आम्ही त्या लोकांना पकडून आणलं आहे.

**राजा** - वा! वा! फारच छान, आणि आणा त्यांना आतमध्ये *(सैनिक सर्वांना आणतात. सगळे उभे.)* अस्सं! मला प्रणाम करण्याची इच्छा नाही वाटते. *(आधी थंडगार व लांबहात्या प्रणाम करतात. त्यांचे पाहून इतर तिघे.)* छान! म्हणजे तुम्ही तिघेच परदेशी आहात तर, आणि काय रे तुम्ही दोघे कोण?

**लांबहात्या** - महाराज आम्ही आपल्या राज्यातलेच आहोत.

**राजा** - म्हणूनच तुमचा चेहरा पाहिल्यासारखा वाटतो आहे. हे पहा, परदेशी लोकांनो, मी तुम्हाला माझी ओळख करुन देतो. मी राजा झांबो आणि हे प्रधान कांगो. तुमची ओळख तुम्ही दाखवायची गरज नाही. थांबा. *(गळ्यातला ताईत घेऊन कानाला लावतो. नीट ऐकतो व बोलतो.)* हा युवराज, व हा यक्ष आणि हा विदूषक, बरोबर? *(तिघे आश्चर्याने हो म्हणतात.)* थांबा आता मी तुमच्या मनातले विचार पण सांगतो. हा विदूषक --- अरेच्या याच्या मनात फक्त झोप, झोप असेच ऐकू येतंय. हा यक्ष--- अरेरे! स्वतःची मंत्रशक्ती वापरता येत नाही म्हणून वाईट वाटलंय ना. आणि हा युवराज -- ओ हो. दिव्य रत्न पाहिजे आहे काय.

**युवराज** - महाराज. तुमचा गैरसमज होतो आहे, आम्ही तुमच्याकडे शत्रु म्हणून आलेलो नाही. मला दिव्य रत्न पाहिजे आहे ते फक्त माझ्या पिताजीचे डोळे परत आणण्यासाठी. मला ते रत्न कायमचे नको आहे. त्यासाठीच आपल्याला विनंती करण्यासाठी म्हणून आम्ही आलो आहोत. तेव्हा तुम्ही आमच्यावर कृपा करावी.

**राजा** - वा! बोलणे तर फार गोड आहे. तुझे. पण मी तुला ते दिव्यरत्न का द्यावे?

**युवराज** - महाराज त्यावर अने जणांचे सुख अवलंबून आहे. तरी कृपया आपण आमच्यावर एवढी कृपा करावी. आम्ही सगळे आपली प्रार्थना करत आहोत. *(सगळे साथ देतात, ''कृपा करा इत्यादी म्हणतात.)*

**राजा** - ठीक आहे. तुम्ही एवढी गयावया करता आहात तर ते दिव्य

रत्न मी तुम्हाला देईन. मात्र मी स्वतः तुमच्याबरोबर तुमच्या राज्यात येईन व तुमच्या राजाचे डोळे परत आले की परत घेऊन येईन. *(सगळे आनंदित झाले. सगळे धन्यवाद असे म्हणतात.)* पण एका अटीवर. मी तुमच्या समोर कांही पण मांडेन, ते सर्व पण तुम्ही यशस्वीरित्या पूर्ण केलेत तरच मी हे सर्व करीन.

यक्ष - पण ? कसले पण महाराज ?

राजा - सांगतो ना. तुम्ही किती --- तिघे आहात ना ?

थंडगार - नाही महाराज आम्ही पाच जण आहोत.

राजा - म्हणजे माझ्या राज्यातले असून तुम्ही परक्यांना सामील ?

लांबहात्या - तसं नाही महाराज. आमची खूप मैत्री झाली आहे.

राजा - ठीक आहे, जशी तुमची इच्छा -- तर तुम्ही पांच जण आहात ना ? मग मी पाच पण मांडतो. मात्र लक्षांत ठेवा की एक पण पूर्ण झाला नाही तर तुमच्यापैकी एकाचा त्याच वेळेस शिरच्छेद केला जाईल. अशा रीतीने पाचही पणांमध्ये तुम्ही सर्व संपून जाल.

युवराज - महाराज, शक्यता आहे की आम्ही यशस्वी सुध्दा होऊत.

राजा - *(हसतो)* पाहूयाच की आता. ऐका माझा पहिला पण सांगतो. तुमच्यापैकी एकाने एक तास पेटलेल्या लाकडांवर पायात काहीही न घालता उभं रहायचं. चला तुम्हाला थोडा वेळ देतो तोपर्यंत कुणीही एकजण तयार व्हा *(हसतो)* प्रधानजी आपण लाकडे पेटवायला सांगूत आणि हे पहा तसंच शिरच्छेदाची पण तयारी कराच. *(हसतो. सगळे घाबरतात. जातो.)*

विदूषक - काय दुष्ट माणूस आहे. म्हणे एक तास आगीत उभे रहा.

यक्ष - युवराज हा या राजाचा दुष्टपणा आहे, त्याला काहीतरी करुन आपणा सर्वांना ठारच मारावयाचे आहे.

युवराज - ते ठीक आहे. पण आता या प्रसंगातून आपण सुटणार कसे ? *(सगळे विचारात.)*

विदूषक - मला वाटतं आपल्यापैकी जो कोणी आपणहून मरायला तयार आहे त्यानं पुढं यावं. *(थंडगार हु - हु - हु - करतो.)* आता तुला काय झालं रे थडथडायला.

थंडगार - मी तयार आहे त्या आगीत उभं रहायला.

युवराज - अरे वेडा आहेस कां, उगाच कां आपले प्राण देतोस.

यक्ष - *(थंडगारला हसतांना पाहून)* अरे तुला हसायला काय झालं ?

**विदूषक** - काय कमाल आहे? इतकं भयानक संकट येऊन पडलंय. मी विदूषक असून हसत नाही, आणि तू मात्र हसतोस?

**थंडगार** - तुम्ही सगळे एक गोष्ट विसरता आहात, मी तुम्हाला काय सांगितलं होतं? अरे, मला शेकोटीत उभं रहायची सवय आहे. *(थोडा वेळ शांतता, मग सगळे एकदम आनंदाने ओरडतात.)*

**राजा** - *(आतून येतो.)* काय झालं एवढा आरडा ओरडा करायला? कां भितीने वेड लागलं सगळ्यांना.

**सगळे** - महाराज आम्ही तयार आहोत.

**राजा** - अस्सं. एवढा आनंद? सांगा बरं कोण मरायला तयार आहे?

**थंडगार** - महाराज, मी पेटत्या लाकडांवर उभा रहायला तयार आहे.

**राजा** - अस्सं. तर पहिला नंबर तुझा लागला तर. चला सगळे, बघा हा काही क्षणात कसा मरतो ते. *(सगळे जातात. दुसऱ्या विंगेतून येतात. नंतर पाठीमागे लाकडे पेटवल्याचा भास.)*

**राजा** - चला जा, उभा रहा त्या लाकडांवर.

**थंडगार** - बरं जातो हं. बरंय मित्रांनो, जातो मी. भेटतोच पुन्हा थोडया वेळाने *(सगळे आनंदाने निरोप देतात.)*

**प्रधान** - महाराज, मला वाटते या लोकांची खरंच डोकी फिरली असावीत. चक्क आनंदाने निरोप देताहेत ते सगळे.

**राजा** - थांबा, तो जळू लागेल म्हणजे त्यांची डोकी ठिकाणावर येतील आता. प्रधानमंत्री ती लाकडं पेटवायला सांगा. *(सैनिक लाकडे पेटवतो. थंडगार एक पाय वर करुन हाताने चोळतो.)* काय झालं? चटका बसला का?

**थंडगार** - छे, छे, पायाला खाज आली होती. *(राजा चिडतो. चौघे हसतात. थंडगार हळु हळु एकेक घोंगडी काढून टाकतो.)*

**राजा** - कमाल आहे, याला काहीच कसं होत नाही? *(चौघे सोडून बाकीचे सर्व आश्चर्य करीत आहेत.)*

**प्रधान** - महाराज, नक्की काहीतरी जादू दिसते आहे.

**राजा** - शक्यच नाही. *(थंडगारला)* का रे तुला कांहीच त्रास होत नाही?

**थंडगार** - होतो ना. थोडंसं उकडतंय. *(चौघे हसतात.)*

**राजा** - *( चिडतो)* ठीक आहे. हो खाली.

**युवराज** - पण महाराज? अजून एक तास पूर्ण झाला नाही.

**राजा** - काही गरज नाही. ज्याअर्थी इतका वेळ हा आगीत उभा राहिला

त्याअर्थी एक दिवस सहज उभा राहू शकेल. एवढं कळण्याइतकी मला अक्कल आहे. तुम्ही पहिला पण जिंकला आहे. *(सगळे आनंदाने आरडा ओरडा करतात.)* चूप बसा? ओरडू नका, थांबा आता थोडयाच वेळात तुम्हाला रडायला लावले नाही तर नावाचा झाम्बो नाही मी. हे पहा तुम्हांला दुसरा पण सांगतो. तुमच्या तिकडच्या देशात मोर नांवाचा प्राणी असतो म्हणे. तसा प्राणी आमच्या राज्यात किंवा त्या जंगलात कधीच सापडत नाही. तुम्ही एक तासाच्या आत एक मोर आणा. लक्षात ठेवा जादू वगैरे काही चालणार नाही. प्रधानजी आता मात्र नक्की एकाचा शिरच्छेद होणार. आम्ही फलाहार करून येतो. *(दोघे हसत जातात. पाचजण विचारात.)*

**यक्ष** - सध्या जर मला मंत्रशक्ती वापरता आली असती तर किती चांगलं झालं असतं. *(निराश होतो.)*

**युवराज** - आता मात्र फारच कठीण पण ठेवला आहे. एवँढया लवकर, आपण आपल्या राज्यात जाऊ पण शकत नाही.

**विदूषक** - आपल्याला इतका कठीण पण सांगून हा राजा फळं खायला जातोय, खरं म्हणजे मला पण किती भूक लागली आहे.

**थंडगार** - मित्रानो मला वाटतं आता आपली सुटका होणार नाही. कारण या राजाने मला सुध्दा याच पणावर हरवलं होतं. लांबहात्या, तुला काही युक्ती सुचतेय?

**लांबहात्या** - नाही बाबा. माझं तर डोकंच चालेनासं झालं आहे. *( सगळे थोडावेळ विचार करतात. अचानक विदूषक हसतो. सगळे त्याला काय झालं म्हणून विचारतात.)*

**विदूषक** - इतका कसा मी वेडा *(हसतो)* एवढे कसे मला कळत नाही. *(हसतो.)* असं कसं विसरलो? *(हसतो.)*

**यक्ष** - मला वाटतं याला वेड लागलं असावं. बहुतेक.

**विदूषक** - *(हसतच)* नाही, नाही, युवराज ----- तोडा.

**युवराज** - तोडा? काय तोडा? नीट बोल काय ते.

**विदूषक** - अहो मोरानं पीस दिलेलं विसरलात काय *(यक्ष व युवराज क्षणभर स्तब्ध. नंतर खुश)* थंडगार आणि लांबहात्या काही काळजी करु नका. आपण हा पण पूर्ण करणार. तुम्ही तो राजा येतोय कां तेवढंच बघत रहा. आला की सांगा. दोघे कानोसा घेतात. युवराज पीस काढून दोन तुकडे करतो. मोर प्रकट होतो. सगळे आनंदित.)

**यक्ष** - हे पहा मोरा, तू जरा बाजूला थांब आणि मी बोलावल्यावर आत ये. *(मोर आत जातो. राजा येतो. बरोबर प्रधान)*

**राजा** - काय रे! आणला का मोर? सगळे तर इथेच दिसताहेत. चला प्रधानजी एकाचा शिरच्छेद करा बघू.

**युवराज** - थांबा महाराज. जरा बघा तरी आम्ही काय आणलंय ते.

**राजा** - काय आणलंय? मला दुसरं तिसरं काही नको. मला फक्त मोर हवा मोर. *(युवराज यक्षाला खुणावतो.)*

**यक्ष** - ठीक आहे महाराज, मोर हवा ना? तर घ्या हा मोर *( मोराला खुणावतो मोर नाचत येतो. त्याबरोबर पाचजण पण फिरतात. महाराज चिडतात.)*

**राजा** - *(संतापलेला)* नक्कीच हा मोर खरा नाही.

**विदूषक** - हात लावून पहा महाराज. *(राजा हात लावतो. मोर निघून जातो.)* काय झालं महाराज? खराच मोर होता ना?.

**राजा** - हो हो, खराच मोर होता. ठीक आहे. तुम्ही हा पण डेखाल जिंकला आहे. *(सगळे ओरडतात.)* चुप बसा. आता तिसरा पण ऐकून घ्या. या शहराच्या बाहेर एक काचेचा डोंगर आहे. त्यावर मी एक ताईत ठेवलेला आहे. तुम्हाला तेथे सैनिक घेऊन जातील. तिथे तुम्हाला सोडण्यात आल्या पासून एक प्रहराच्या आत तो ताईत तुम्ही मिळवला पाहिजे. जर मिळवू शकला नाहीत तर मात्र एकाचा शिरच्छेद नक्कीच होईल. कुणी मरायचं ते तुम्ही ठरवा. सैनिकांनो यांना सोडा त्या डोंगराजवळ. मी येतोच एक प्रहरामध्ये. आणि परदेशी लोकांनो, एक लक्षात ठेवा की त्या डोंगराच्या भिंती इतक्या गुळगुळीत आहेत की, त्यावर मुंगीसुध्दा चढू शकत नाही. *(हसत जातो. प्रधान पण जातो. सैनिक सर्वांना घेऊन जातात.)*

## प्रवेश पांचवा

*(काचेच्या डोंगराजवळ, डोंगर विंगमध्ये आहे. त्याच्याकडे बघत बघत चौघे येतात. लांबहात्या मात्र नाही. युवराज, यक्ष व थंडगार, डोंगरावर चढतांना खूप आपटलेले.)*

**यक्ष** - विदूषका आता ही चौथी बाजू राहिली फक्त. तिन्ही बाजूंनी आम्ही चढण्याचा प्रयत्न केला आणि आम्ही तिघंही चांगलेच आपटलो आहोत.

आता तूच एक राहिलास जा चढ.

विदूषक - *(आतमध्ये पहात)* मात्र ही बाजू सुध्दा तशीच दिसते आहे. तुम्हीतर आपटला आहातच, मग पुन्हा मला कशाला आपटायला सांगता. अशी मोडतोड करून घेण्यापेक्षा शिरच्छेद करून घेणं बरं.

युवराज - विदूषका, एक प्रहर संपत आलाय. आता तो राजा पण लवकरच येईल. बघ बाबा त्या आधी प्रयत्न करून. *(सगळे जबरदस्ती करतात विदुषक नाईलाजाने चढण्याचा प्रयत्न करतो. खाली आपटतो. असे तीन वेळेस. शेवटी तो पण कण्हत बसतो.)* मला वाटतं आता आपण असेच पुन्हा पुन्हा प्रयत्न करून म्हणजे आपोआप मरूच. मग शिरच्छेदाची काय भिती? *( चौघेही डोक्याला हात लावून बसतात.)*

लांबहात्या - *(दुसऱ्या बाजूने फळे खात येतो.)* अरेरे! काय झालं तुम्हाला एवढं निराश व्हायला? *(सगळे चाट पडलेले)* घ्या फळं खा. चांगली गोड आहेत. माझं तर पोट भरलं बुवा.

विदुषक - कमाल आहे तुझी. म्हणजे तू इतका वेळ फळं खात होतास चांगलं आहे. इकडे आम्ही आपलं आपटतोय.

लांबहात्या - पण तुम्हाला एवढं लागलं कसं?

युवराज - कमाल आहे मित्रा, अरे तुला काहीच कशी काळजी वाटत नाही रे. अरे तो राजा येईल सुध्दा.

लांबहात्या - त्याची वेळ होत आली म्हणून तर मी आलो.

थंडगार - छान! इतक्या उशीरा? आता तूच मरायला तयार हो.

विदूषक - बरोबर आहे. नाही तरी आम्ही मेल्यातच जमा आहोत.

लांबहात्या - बरं ते नंतर बघू, आधी फळं तर खा.

यक्ष - तुला वेड तर नाही ना लागलं. अरे तो ताईत कुठं मिळालाय अजून? हा पण नक्कीच हरणार आपण.

लांबहात्या - काळजी करू नका. तुम्ही इतके कसे विसरभोळे? अरे तुम्ही महत्वाची गोष्ट विसरलात अरे माझा हात - *( सुरूवातीला कुणाच्या लक्षांत येत नाही. नंतर लक्षात आल्यावर सगळे आनंदीत.)*

लांबहात्या - थांबा हं. आता हे बघा *(विंगेत हात नेतो. सर्वजण वर वर पहात जातात. हात परत येतो. तेव्हा त्याला ताईत.)* खा. आता तरी फळं खा. *( सगळे फळं खातात.)* *(राजा, प्रधान व सैनिक येतात. आश्चर्यचकीत.)*

राजा - वा, तुम्ही सगळे अगदी आरामात बसला आहात. बहुतेक

मरणापूर्वीची मेजवानी दिसते आहे. तुम्हांला ताईत मिळणं शक्यच नाही. चला कोण मरायला तयार आहे ते पुढं या. *(लांबहात्या पुढे येतो राजा हसतो.)* प्रधानजी, करा याचा शिरच्छेद. अरे मुर्खांनो फळं खात बसलात. बघा तुमचा मित्र कसा मरतो आहे ते. *( प्रधान पुढे जातो. लांबहात्या त्याला थांबवतो व त्याने पुढे केलेल्या तलवारीला हार घातल्याप्रमाणे ताईत घालतो. बाकीचे टाळ्या वाजवतात. राजा चिडतो.)* चूप बसा. नक्कीच काहीतरी गडबड आहे खास, पण ताईत तर तोच आहे. ठीक आहे पुन्हा तुम्ही जिंकलात. थांबा ओरडू नका. आत चौथा पण ऐका. तुमच्यापैकी एकाला राजवाड्याच्या एका खोलीत डांबून ठेवले जाईल. तुमच्यापैकी इतर कोणालाही आत जाता येणार नाही आणि माझं जेवण होईपर्यंत त्याने स्वतःची सुटका करून घेतली पाहिजे, मात्र लक्षात ठेवा तुम्हाला कुणालाही आंत जाऊन मदत करता येणार नाही. शिवाय जो आतमध्ये बांधलेला असेल त्याचा नंतर शिरच्छेद केला जाईल. चला सगळे. आणि लक्षात ठेवा की जो आंतमध्ये असेल त्याला चांगलं जाड दोरखंडानी पलंगाला बांधून टाका. बघूया कशी सुटका होते ते. सैनिकांनो त्यांना आपापसात ठरवू द्या कोण मरणार ते. त्याला आत नेऊन बांधा आणि बाकीच्यांना बाहेर ठेवा. आणि खोलीचं दार लावून घ्या. तुम्ही सुध्दा आत जायला नको. *(राजा व प्रधान जातात.)*

**सैनिक** - चला, लवकर ठरवा कोण आत राहणार ते.

**यक्ष** - युवराज, मी स्वतः थांबतो आत मध्ये

**युवराज** - यक्षा, पण तू कसा काय सुटू शकशील ?

**यक्ष** - बघुया काय होतंय ते. जर नाही सुटू शकलो तर तुमच्या सेवेत माझे प्राण गेले असं समजेन मी. *(बाकीचे नको नको म्हणतात. पण शेवटी तयार होतात. सैनिक सर्वांना घेऊन जातात.)*

**अंधार**

## प्रवेश सहावा

*(राजवाडा, सैनिक, यक्ष सोडून बाकीच्यांना आतून आणून सोडतात.)*

**सैनिक** - पाहिलंत ना आपल्या डोळ्यांनी तुमच्या मित्राला किती कडक बंदोबस्तात ठेवलंय ते. आता तो सुटणंच शक्य नाही. आता बसा तुम्ही इथेच. आम्ही बसतो पहारा देत. *(जातात. सगळे निराश झालेले.)*

युवराज - मित्रांनो माझ्यासाठी बिचाऱ्याचा प्राण फुकट जाणार, तुम्ही पाहिलंत ना त्याला कसं बांधलंय ते? आता कसा काय सुटणार? असा राग आलाय त्या राजाचा.

विदुषक - मला पण राग आलाय. वाटतंय फडाफडा त्याच्या तोंडात माराव्यात किती दुष्टपणा करतो.

लांबहात्या - मला वाटतंय की इथून हात लांब करून त्याच्या दाढीचे केसच कुरतडून काढावेत.

युवराज - *(एकदम आनंदाने)* केस - कुरतडून - केस कुरतडून -

विदुषक - तुम्हाला काय झालं युवराज मध्येच?

युवराज - विदूषका केस दे, केस दे लवकर, आणि बघ गंमत. *( विदूषक गडबडीत स्वतःचा केस देतो. युवराज तो तोडतो. सर्व अपेक्षेने बघतात. युवराज निराश होतो.)*

युवराज - छे! ऊंदराने फसवलं तर नाही. तो आला कसा नाही.

विदूषक - *(डोक्यात प्रकाश पडून)* ओ हो, तुम्हाला तो शेपटीचाच केस पाहिजे कां? चुकून मी माझ्या डोक्याचा दिला.

युवराज - *(चिडतो)* गाढव आहेस. आण इकडे. *(शेपटीचा केस विदुषकाकडून घेतो. तो तोडतो. उंदीर येतो.)*

उंदीर - कां बोलवलंत युवराज?

युवराज - अरे उंदरा, आतल्या खोलीत यक्षाला बांधून टाकलं आहे, वरच्या बाजूस एक खिडकी आहे, तू त्यामधून जा, आणि त्याचे दोरखंड तोडून त्याला सोडव.

उंदीर - आत्ता सोडवतो, इथल्या उंदरांना पण मी मदतीला घेतो. *(जातो)*

युवराज - वा, आता आपल्या यक्षाची सुटका होईल. त्या राजाने थोडा वेळ दिला पाहिजे फक्त *(थोडा वेळ जातो. राजा येतो.)*

राजा - काय झालं आला का तुमचा मित्र बाहेर. *(सगळे गडबडतात.)* थांबा! मीच पहातो. पण लक्षात ठेवा जर का मी दार उघडल्यावर तो तिथेच दिसला तर तो वाचणार नाही. सैनिकांनो इकडे या, यांच्यापैकी कुणी मदत करायला गेलं होतं काय? *(सैनिक - नाही)* ठीक आहे. एकजण पहाऱ्यावर थांबा, आणि एकजण जाऊन प्रधानजींना बोलवा. ते आले म्हणजे त्यांना मला बोलवायला पाठवा. मी वाट पहातो त्यांची. *(जातो. सैनिक जातात.)*

विदूषक - बरं झालं. तेवढाच वेळ मिळाला. आता प्रधानजींनी थोडा

वेळ लावला पाहिजे. *(प्रधान येतो.)* हे काय, तुम्ही इतक्या लवकर कसे काय आलात ?

**प्रधान** - कसे काय म्हणजे ? मी आधीच घरून निघालो होतो.

**लांबहात्या** - दुर्दैव आपलं. दुसरं काय ?

**थंडगार** - जाऊ द्या महाराज. त्याच्याकडे काय लक्ष देता तुम्ही. बाकी तुमचे कपडे फारच सुरेख आहेत हं, शिवाय --

**प्रधान** - बंद कर बडबड, मला अडकून तुम्हाला वेळ काढायचाय हे माझ्या लक्षात आलंय, पण ते जमणार नाही.

**थंडगार** - माफ करा महाराज, चुकी झाली, पाय धरू द्या. *(पाय धरल्याबरोबर प्रधानाला थंडी वाजते. थोडा वेळ गोंधळ, प्रधान जातो. इतक्यात दुसऱ्या बाजूने यक्ष हसत हसत येतो. (सगळ्यांना आनंद होतो.)*

**युवराज** - बरं झालं तू लवकर आलास मित्रा.

**यक्ष** - अरे काय सांगू. जवळ जवळ शंभर उंदीर आत आले आणि त्यांनी मला सोडवले, मी चक्क खिडकीतून उडी मारून बाहेर आलो, आणि इकडे आलो. *(इतक्यात राजाचा आवाज येतो. यक्ष चौघांच्या मागे लपतो.)*

**राजा** - चला प्रधानजी, लवकर दार उघडून त्याचा शिरच्छेद करू या. *(चौघांना)* काय रे तुम्हाला बघायला यायचंय का त्या यक्षाला मारतांना *(हसतो)*

**युवराज** - महाराज, आम्ही त्याला बघायला येण्यापेक्षा तुम्ही जरा इकडे बघा ना. *(यक्ष पुढे येतो. राजाचा जळफळाट.)*

**राजा** - हे कसं काय शक्य आहे ? नक्कीच काहीतरी जादू आहे.

**प्रधान** - पण महाराज तुम्हीच म्हणालात ना की जादू शक्य नाही म्हणून.

**राजा** - चुप बसा प्रधानजी. मला नका अक्कल शिकवू -- ठीक आहे मुर्खांनो आता शेवटचा सगळ्यात कठीण पण ऐका. हा पण जर तुम्ही जिंकलात तर तुम्ही यशस्वी व्हाल, आणि मी माझे वचन पूर्ण करायला बांधलेला राहीन. पण जर पण हरलात तर मात्र यावेळेस तिघांचाही शिरच्छेद केला जाईल. हे दोघे आमच्या राज्यातले असल्यामुळे या दोघांना वगळले आहे. हा पण तुम्हा तिघांना लागू आहे. पण असा की, तुम्ही तिघांनी एकेक खोटं वाक्य सांगायचं, मात्र ते खोटंच असलं पाहीजे. ते खरं असण्याची शक्यता नसेल तरच तुम्ही वाचाल. मी बाहेर जाऊन येतो. तोपर्यंत विचार करा. *(जातो.)*

विदूषक - काय वेडा राजा आहे, किती सोपा पण आहे. मी सांगेन की मी हत्ती आहे म्हणून. आता हे वाक्य खोटं नाही कां?

युवराज - मला पण कांही समजत नाही, त्याने असा काय पण घातला ते.

यक्ष - मला वाटतं यात नक्की काहीतरी गडबड असावी.

लांबहात्या - मित्रांनो गोंधळूही नका आणि गडबडही करू नका. मी तुम्हांला सांगतो यात राजाचा काय डाव आहे ते. मी आतापर्यंत या राजवाड्यात बऱ्याच अशा घटना पाहिल्या आहेत. एक लक्षात ठेवा की या राजाला जादू येते. हे बघ विदुषका समजा जर तू त्याला मी हत्ती आहे असं वाक्य सांगितलंस तर तो म्हणेल 'झिंगोला'. याचा अर्थ तसेच होईल. आणि तू खरंच हत्ती होशील, मग ते वाक्य खोटं कसे होईल. असेच मागे एकांने सांगितलं होतं की मी चिमणी आहे. राजा म्हणाला 'झिंगोला' आणि तो खरंच चिमणी झाला. दुसरा म्हणाला की मी म्हातारा आहे. की या राजाने 'झिंगोला' म्हणून त्याला खरंच म्हातारं केलं. तेव्हा जरा जपूनच बरं तिघेही. कारण एकाचे जरी वाक्य चुकलं तरी आपण हरून जाऊत.

थंडगार - खरंच सांभाळा हं, नाहीतर आपल्या सगळ्या श्रमावर पाणी पडेल. *(तिघे वेगवेगळी वाक्य म्हणून पाहतात पण योग्य वाक्य सापडत नाही, इतक्यात राजा व प्रधान येतात, बरोबर सैनिक)*

राजा - काय झालं? शेवटी काहीच सुचलेलं दिसत नाही, चला प्रधानजी मी एकेकाला विचारतो त्याचं उत्तर बरोबर नसलं की लागलीच डोकं उडवायचं. हां, युवराज पहिला क्रमांक तुमचा. सांगा वाक्य *(वातावरणांत तणाव)*

युवराज - मी -- मी -- राजा झांबो आहे.

राजा - *(झिंगोला म्हणणार, इतक्यात थांबतो.)* नाही नाही, हे वाक्य खोटं आहे.

युवराज - *(हसतो)* कबूल आहे ना हे वाक्य खोटं आहे म्हणून.

राजा - *(चडफडतो)* ठीक आहे, यक्षा आता तुझी पाळी.

यक्ष - मी या क्षणाला तुम्हाला ठार मारणार आहे.

राजा - नाही नाही. हे वाक्य खोटं आहे.

यक्ष - मी सुध्दा तेच म्हणतोय महाराज की हे वाक्य खोटं आहे.

राजा - *(राग वाढतच आहे)* विदूषका तू सांग आता.

**विदूषक** - *(घाबरत घाबरत पुढे येतो. पुटपुटत आहे.)* मी काय करू ? मी बोललेलं प्रत्येक वाक्य खोटं असतं. ऐक राजा झांबो! माझं खोटं वाक्य ऐक. ते वाक्य असं की "मी बोललेलं प्रत्येक वाक्य खोटं असतं"

**राजा** - झिंगो ऽ ऽ *(अचानक थांबतो)* पण मी म्हणतो की हे वाक्य खरं आहे.

**विदूषक** - म्हणजे याचा अर्थ असा झाला की, जर हे वाक्य खरं धरलं तर माझं बोललेलं प्रत्येक वाक्य खोटं असतं हे तुम्ही मान्य करता आहात. म्हणजे हे वाक्य सुध्दा खोटं नाही का झालं ? *(सगळे आनंदाने ओरडतात. राजा हरला, राजा हरला. राजा चिडून ओरडून त्यांना गप्प बसवतो.)*

**युवराज** - महाराज आता तुम्हांला ते दिव्य रत्न घेऊन आमच्या बरोबर यावं लागेल. तसे तुम्ही वचन दिलं आहे.

**राजा** - अरे जा. म्हणे वचन दिलं आहे. तुला काय वाटलं मी हे वचन पाळीन *(सगळे आश्चर्यचकीत)* जा, जा, मुर्खांनो, तुम्ही इथून जिवंत बाहेर सुध्दा जाऊ शकणार नाही. *(विकट हास्य. इतक्यात भयानक कडकडाट. सगळे दचकून वर पहातात.)*

**आकाशवाणी** - मूर्ख राजा, काय केलंस तू हे.

**राजा** - *(दचकतो.)* कोणाचा आवाज आहे हा. कोण बोलतंय ?

**आकाशवाणी :** - मला विसरलास. अरे मी "अपोलो" *(सगळे नतमस्तक होतात.)* झाम्बो तुला मी मंत्रशक्ती दिली होती. तेंव्हाच अट घातली होती की कधी वचन भंग करू नकोस म्हणून. पण आज तू वचन भंग केलास, म्हणून तुझी मंत्रशक्ती मी काढून घेत आहे.

**राजा** - देवा क्षमा कर. माझी चूक झाली.

**आकाशवाणी** - नाही, या अपराधाला क्षमा नाही. यापुढे तुला मंत्रशक्ती नाही. तसेच तुझ्या शक्तीचे दुसऱ्यांवर झालेले परिणाम पण नाहीसे होतील. *(राजा खाली मान घालून. थंडगारची थंडी थांबते.)*

**थंडगार** - माझी थंडी थांबली म्हणजे माझी जादू पण परत आली.

**यक्ष** - म्हणजे मला पण मंत्रशक्ती वापरता येईल.

**युवराज** - राजा ऊठ आता, दे ते रत्न मला.

**राजा** - *(चिडून)* अरे जा, मंत्रशक्ती नसली तर काय झालं. तुम्हाला मी जिवंत ठेवत नाही. सैनिकांनो पकडा त्यांना *(सैनिक पुढे येतात. थंडगार मंत्र टाकतो. सैनिक हसत सुटतात व तलवार टाकून निघून जातात.)*

**राजा** - प्रधानजी, चालवा तुमची तलवार *(प्रधान वार करतो.)* युवराज

अडवतो. इतक्यात थंडगार मंत्र टाकतो. प्रधान कोलांट्या उड्या मारू लागतो.) ठीक आहे, मीच तुला ठार करतो. *(कमरेची कट्यार काढून फेकू लागतो. यक्षाच्या मंत्राने त्याचा हात वरतीच अटकतो.)*

**यक्ष** - राजा रत्न दे नाहीतर तुझा हात तसाच राहील. *(राजा गप्प)* आता ही बघ गंमत. *(मंत्राने राजाचा दुसरा हात गरगर फिरू लागतो. शेवटी राजा कबूल होतो. राजा व प्रधान पूर्ववत.)*

**राजा** - मी रत्न समुद्राच्या काठावर लपवलं आहे. चला सगळे तिकडं.

*( अंधार होतो )*

## प्रवेश सातवा

*(निळ्या समुद्राचा किनारा)*

*(राजा, प्रधान व पाचजण येतात.)*

**विदूषक** - मला दाखवा कुठे आहे ते दिव्य रत्न.

**राजा** - तुम्ही थोडे दूर सरकून उभे रहा. माझी गुप्त खजिन्याची जागा आहे ती. तुम्ही पाहू नका. *(राजा व प्रधान सोडून बाकी आंत.)* प्रधानजी त्या समुद्राच्या जवळ एक खबदाड आहे, त्यामध्ये ते रत्न आहे. तुम्ही ते काढा आणि त्यांना बोलवा. मी इकडे थांबतो. त्यांचं लक्ष रत्नावर राहील. मी त्याच वेळेस कट्यार फेकून त्या यक्षाचा जीव घेणार आहे. *(प्रधान जातो. रत्न काढतो. रत्न प्रकाशीत आहे. इतक्यात समुद्रातून एक भयानक प्राणी वर येतो, आणि प्रधानाला पकडून घेऊन जातो. राजा घाबरून वाचवा, वाचवा ओरडतो. कट्यार पडून जाते. सगळे येतात.)*

**राजा** - *(भयानक घाबरलेला)* प -- पा -- पाणी केवढा भयानक प्राणी -- समुद्रातला -- प्रधान आणि रत्नाला घेऊन गेला. *(पळत जातो, वेड्यासारखा)*

**थंडगार** - हा तर पार वेडा झालाय. आता रत्न कसं काय सापडणार? समुद्रातल्या प्राण्यानं खरंच नेलं असेल, तर ते रत्न कुठे असेल आता?

**युवराज** - थांबा. मी चेटकीणीलाच बोलावतो. *(टाळीत आपटतो, चेटकीण येते, गोलासकट)*

**यक्ष** - चेटके, तुझ्या गोलात बघून ते रत्न कुठे आहे ते सांग.

**चेटकीण** - *(मंत्र म्हणून गोलात पाहते.)* ते रत्न समुद्रातल्या राक्षसाच्या

दाढेत अडकलेलं आहे. माझी वेळ झाली, मी जाते. *(चेटकीण जाते.)*

**विदुषक** - आता ते रत्न कसं काय सापडणार?

**यक्ष** - एक मार्ग आहे. युवराज तू समुद्राजवळ जा. तुला पाहून तो राक्षस वर आला की मी त्याला मंत्राने पुतळा करीन. नंतर तू त्याला ठार मार, आणि रत्न काढून घे. *(युवराज किनाऱ्याजवळ जातो. प्राणी वर येतो. यक्ष मंत्र टाकतो. युवराज तलवारीने त्याच्यावर वार करतो आणि रत्न काढून घेतो. प्राणी समुद्रात कोसळतो. सगळे आनंदित होतात.)*

**युवराज** - यक्षा, आता कधी आपल्या पिताजींना जाऊन हे रत्न दाखवतो असं झालंय मला.

**थंडगार** - एवढंच नां. थांब मी त्यांना जादूने बोलावतो. *(मंत्र म्हणतो. युवराजाचे आई वडिल येतात.)*

**युवराज** - महाराज मी युवराज.

**महाराज** - काय? तू पुन्हा माझ्यासमोर कसा आलास? आणि मी कुठे आलो आहे?

**युवराज** - महाराज हे किथरॉन राज्य आहे. जरा इकडे पहा महाराज *(रत्नाचा प्रकाश डोळ्यात पडल्याबरोबर राजाला दिसू लागते.)*

**महाराज** - मला दिसू लागलंय -- हे सगळे कोण आहेत?

**युवराज** - महाराज ते सगळं नंतर सांगेन मी. पण हे सगळे माझे मित्र आहेत, यांच्यामुळेच तुम्हाला दृष्टी प्राप्त होऊ शकली. आणि हा यक्ष म्हणजेच तो सोनेरी डोक्याचा मासा.

**महाराज** - यक्षा, युवराज, तुम्ही सगळे मला क्षमा करा.

**यक्ष** - बरंय मित्रांनो, माझे काम संपले. मी आता जातो. थंडगार आता तू इथला राजा हो, आणि लांबहात्या तू प्रधान हो. मात्र दुष्टपणानं राज्य करू नका. बरंय युवराज आता मला परत जायलाच हवं. जातो मी.

*(यक्ष समुद्रामध्ये जातो. सगळे निरोप देतात.)*

(पडदा)

**-: समाप्त :-**



BVBK-04025

## आमची आगामी प्रकाशने

अपूर्वाईची नवलकहाणी : राजा मंगळवेढेकर
एका फुलपाखराची गोष्ट : महावीर जोंधळे
वऱ्हाड निघालंय लंडनला : डॉ. लक्ष्मण देशपांडे
प्रतिकार : डॉ. लक्ष्मण देशपांडे
निनादातले प्रहर : महावीर जोंधळे
नभ मातीच्या कुशीत : श्री. दि. इनामदार
पुनर्जन्म : डॉ. अ. वा. वर्टी
प्रश्नपक्षी : प्रभा पार्डीकर
सुवर्णगंध : डॉ. यु. म. पठाण
बांसरी : मालती दांडेकर
चांदवा : गो. या. सावजी

## इतर प्रकाशने

उत्तररात्र : अनुराधा वैद्य
शिवदिनकेसरीनाथ, व्यक्ती आणि वाङ्मय : मंगला वैष्णव
फूल फुलता राहीना : श्री. दि. इनामदार
आजकाल : जयश्री खारकर
कामगार कल्याण : विद्याधर सदावर्ते
शिकार : वसंत अ. कुंभोजकर
मृगशिण : माधव कानडे
आफत : भास्कर कुलकर्णी
आत्याबाईला मिशा : सुनेत्रा ओक

# कीर्ती प्रकाशन


***